# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



वारी १९८२ ]  [ किंमत एक रुपया

श्री साईनाथ वाचनालय

लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

2

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
**श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री.सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

## श्रीसाई वाक्सुधा

किंमत १ रुपया (अंक १०

जानेवारी १९८२

: कार्यालय :
प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१

वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

धन्य श्रीसाई तुझें चरण ।
धन्य श्रीसाई तुझें स्मरण ॥
धन्य श्रीसाई तुझें दर्शन ।
जे कर्म बंधन मोचक ॥ १ ॥

जरी सांप्रत अदृश्यमूर्ति ।
तरी धरितां भाव भक्ति ।
समाधिस्थ जागती ज्योती ।
सद्यः प्रतीति भक्तार्थ ॥ २ ॥

दोरी सूक्ष्म धरिसी ऐसी ।
पाहूं जातां दिसों ना देशी ।
परी निजभक्तां खेचून आणिशी ।
देशीं विदेशीं असो कीं ॥ ३ ॥

आणूनि सोडिसी पायांपाशीं ।
प्रेम धरिसी त्यां पोटाशीं ।
माता जैसी निजबाळकासी ।
तैसा तूं पोशिसी अवलीला ॥ ४ ॥

ऐसे कांहीं सूत्र चाळविसी ।
न कळे कोणा कोठे असरी ।
परी परिणामीं वाटे मनासी ।
आहेस कीं पाठीसी भक्तांच्या ॥ ५ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४६ वा.

## ख्रिस्ती शताब्दा प्रमाणे सुरु होणारे नूतन वर्ष

आमच्या सर्व वाचकांना
लेखक—कवींना
हितचिंतकाना व
समस्त श्रीसाईभक्तांना
सुखाचे, उत्कर्षाचे व
भरभराटीचे जावो


—संपादक



# अनुक्रमणिका


१) संपादकीय – मानव धर्माचे पाईक व्हा
२) श्री संत गोविंदमहाराज – श्री. गणपतराव सामंत
३) श्रीसाईबाबा संस्थान वाचनालय – सदानंद चेंदवणकर
४) भक्ती – डॉ. के. भ. गव्हाणकर
५) भगवान श्रीसाई – श्री. बाळकृष्ण देसाई
६) भक्तीभाव – श्री. भालचंद्र पोटकुळे
७) जैसा जैसा भावे...... – श्री. महादेव भिडे
८) असाही एक अनुभव – श्री. दिलीप परदेशी
९) बाबांची कृपा – श्री. शितोळे जे. एस.
१०) निर्वाणीची हाक मारा, बाबा येतात – सौ. पद्मावती वैद्य
११) बंगलोरचे १९ वे अखिल भारतीय साईभक्तांचे अधिवेशन – साईनंद
१२) राधाकृष्ण स्वामीजींचा पुतळा प्रतिष्ठापना समारंभ
१३) ॲपॉस्टल ऑफ लव्ह – ग्रंथपरिक्षण
१४) श्रीसद्गुरु साईनाथाय नमः – सौ. मंदाकिनी केजे
१५) राधाकृष्ण स्वामींना प्रणाम – सौ. तारा चेंदवणकर
१६) तू आहेस अनंत – राधाकृष्ण गुप्ता
१७) साईस्तुती – श्री. विजय बनसोडे
१८) साई ठेवी मला तुमच्या द्वारा – सौ. कल्पना कोरडे
१९) मी साईनाथ पाहिले – श्री. तु. नाईक
२०) साईचरणांचा दास – श्री. जयसिंग वागरे
२१) साईबाबांची आरती – सौ. मंदा खापरे
२२) साई रे ! समर्थ छत्र – सौ. वासंती नांदेडकर
२३) साई जग के विधाता – सौ. चंद्राबेन भाटे
२४) साई महिमा – श्री. पंढरीनाथ खर्डेकर
२५) योग्यता नसता दर्शन कृपा – सौ. सरोजिनी निबंधे
२६) एक त्रिकोण – श्री. दिगंबर गंधे
२७) साई परिवार वृत्त विशेष – —
२८) माझ्या राजुचा लग्नसोहळा – लीलाताई गोलतकर
२९) साई गीत तुषार – श्री. सुहास देसाई
३०) शिर्डीवृत्त – आक्टोबर ८१
३१) शिर्डीवृत्त – नोव्हेंबर ८१

# मानव धर्माचे पाईक व्हा




जगांतील दुःखभार हलका व्हावा, जास्तीत जास्त लोकांना समाधानाचा श्वास सोडता यावा व शाश्वतसुख कशात आहे, याची लोकांना जाणीव व्हावी, यासाठी देव संतांच्या रूपाने जगात वावरत असतात. इतर थोर संतांप्रमाणे साईबाबा शिरडीत अवतीर्ण झाले व त्यांनी जनतेला शाश्वत सुखाचा मार्ग समजावा यासाठी परोपरीने प्रयत्न केले. ज्याचा जसा कल असेल, ज्याचे जे आराध्य दैवत असेल, ज्याला ज्या नामाची गोडी लागली असेल, ते त्याने ध्यावे, त्याचे चिंतन करावे, आपल्या आवडीच्या व सरावाच्या मार्गाने जावे परंतु दांभिकपणाचा व अहंकाराचा त्याग करावा, गोरगरिबांच्या सेवेत आनंद मानावा, मानवसेवा हीच देवसेवा समजून जे दुःखीकष्टी असतील, रोगांनी पिडलेले व संकटग्रस्त असतील, त्यांची सेवा करावी व अशा मार्गांनी स्वतः सुखी होऊन इतरांनाही सुखी करण्यासाठी झटावे याची शिकवण परोपरीने दिली.

सर्व प्राणिमात्रात मी आहे.; मी वेगळा असा नाही. मी तुझ्यात आहे तसाच सर्वांत आहे. 'पाही भूतमात्रा जो मज। तोच माझिया प्रीतीचा समज।' असे बाबांनी ठासून सांगितले आहे; परंतु आमची दृष्टि स्वतःपलिकडे सहसा जाऊ शकत नाही. माझे दुःख माझ्या अडचणी, माझे अनारोग्य, माझी नोकरी चाकरी, याचीच आम्हाला सदासर्वकाळ चिंता व त्यासाठीच बाबांची आठवण करायची, हा आहे आमचा नेहमीचा खाक्या! आमची मजल यापलिकडे जाऊ शकत नाही, ती गेली पाहिजे. 'केवळ ऐहिक सुखा लागुनी। जन शिरडीस येती धावूनी। लागती मज फकिराचे भजनी। ब्रह्म कोणीही न मागती॥' अशा शब्दात बाबांनी भक्त म्हणविणाऱ्यांच्या भावनांचा परिचय करून दिला आहे.

जे जे तुम्ही मागता ते ते बाबा देतात; कारण तुम्ही सुखी व्हावे, नेहमी आनंदात रहावे असे त्यांना वाटते. परंतु हा मानवजन्म एवढ्यासाठीच का आपणाला मिळाला आहे? या जन्मासारखा श्रेष्ठ जन्म दुसरा कोणताही नाही. तो आपण नको का शोभवायला? मग तो कसा शोभवायचा? त्याची महति कशा रीतीने वाढवायची? केवळ स्वतःचे व आपल्या कुटुंबियांचे सुखसमाधान पाहून का?

'ब्रह्म कोणीही न मागती !' असें बाबांनी म्हटले आहे, त्याचा गूढार्थ आपण समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःचे सुख साधणे हा स्वार्थ झाला; आणि केवळ तेवढ्यासाठी आम्ही बाबांच्या दारी धरणे धरून बसावयाचे ?

स्वार्थ हा आमच्या बारशाला पुजलेला आहे. त्यासाठी झटणे हा स्वभावधर्म झाला. त्या धर्मापासून कोणीही च्युत होऊ नये, परंतु स्वार्थ साधून आपण परार्थासाठीही झटले पाहिजे, त्याकडेही लक्ष पुरविले पाहिजे.

ज्या दिवशी तुमच्या ठिकाणचा आपपर भाव नाहीसा होईल, ज्या दिवशी 'भुकेल्या भाकर आधी द्यावी,' असे तुम्हाला वाटेल, दुःखितांची, रोगपीडितांची अनन्यभावे सेवा हीच भगवंताची सेवा अशी मनोमन साक्ष पटेल, त्या दिवशी साईबाबांची शिकवण तुम्ही पचनी पाडण्याच्या मार्गावर आहात असे म्हणता येईल. सेवाभावाने वागत असता, निष्काम व निरहंकार वृत्तीने वावरत असता मनाला जो सात्विक आनंद होईल, त्याची तुलना कशाशीही करता येणार नाही. 'ब्रह्म' म्हणतात ते त्या आनंदापेक्षाही आगळे असेल असे वाटत नाही. त्या ब्रम्हानंदासाठी आपण झटावयाचे आहे. त्याच्या आसपास वावरता यावे म्हणून बाबांनी सांगितलेल्या मार्गांनी आपण अहर्निश झटावयाचे आहे.

आम्ही आज ज्या ठिकाणी वावरत आहोत त्या आमच्या सभोवार पसरलेल्या जनतेचे कल्याण, तिचे दुःख व समाधान हे आमचे एकमेव ध्येय होऊन राहिले पाहिजे. हाच धर्म बाबांनी अखंड आचरणात आणला; तोच कित्ता आम्ही गिरवला तर जन्मा आलियाचे सार्थक. 'साधुनि निजब्रह्म स्थिति । जनतेच्या कल्याणा झिजती ऐसे संत महामति । विरळा जगी असतील ॥'

बाबांना या गोष्टीची पूर्णतया जाणीव झालेली होती. स्वार्थ सोडून त्या पलिकडे जग पहाणारी व त्यांच्यात वावरण्यात आनंद मानणारी माणसे जगात फार थोडी आहेत आणि ते बरोबरच आहे. 'बहुत सुकृताची जोडी । म्हणून विठ्ठल आवडी ।' विठ्ठलाची, जनताजनार्दनाच्या रूपाने नटलेल्या विठ्ठलाची सेवा करावी, त्यांच्या आनंदासाठी व सुखसमाधानासाठी झटावे असे सर्वांना वाटू लागल्यावर या भूलोकी सर्वत्र नंदनवन किंवा स्वर्गलोक अवतीर्ण झालेला दिसू लागेल !

परंतु वस्तुस्थिती तशी नाही. ती कशी आहे याची आपणास जाणीव झालेली आहे. अशा स्थितीत बाबांनी शिकविलेल्या व स्वतः आचरणात आणलेल्या मानव धर्माचे पाईक होण्याचा प्रयत्न आपण का करू नये ? 'जनतेच्या कल्याणा झिजती ! ऐसे संत महामती !' होण्याचे ध्येय सतत दृष्टीपुढे ठेऊन ते आचरणात आणण्यासाठी झटण्यात आपण इतिकर्तव्यता का मानू नये ?

बाबांनी अशा लोकांची गणना थोर बुद्धिवंतांत व संतांत केली असून असे संत, महामती फार विरळा असल्याचे ध्वनित केले आहे; परंतु ते असू शकतात, पूर्वी होते व आजही आहेत, हाही बोध त्यावरून होतो.

आणि म्हणूनच त्या विरळ वर्गात जाण्यासाठी आपण अहर्निश झटावयाचे व त्यासाठी जिवाचे रान करावयाचे आहे. तशी प्रेरणा बाबांनी आपल्या सर्व भक्तांना द्यावी हीच प्रार्थना!

●

## श्री. नानासाहेब रासने यांचा सत्कार


श्रीसाईबाबांचे हयातीपासूनचे एक भक्त व तदनंतर साईबाबा संस्थानचे एक निस्सिम प्रमुख कार्यकर्ते श्री. दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने यांना ८१ वे वर्ष लागल्या बद्दल संस्थानच्या कर्मचारी वर्गातर्फे थाटाने सत्कार शांती निवास हॉलमध्ये दिनांक १७-८-८१ रोजी सकाळी ९ वा. करण्यात आला. मुंबईचे एक श्रेष्ठ साईभक्त श्री. सीताराम धानू हे या प्रसंगी अध्यक्ष होते. या प्रसंगी श्री. क. हि. काकरे साहेब, श्री. रामराव शेळके, डॉ. कीर्तीकर श्री. गावडे, हिरालाल नाईक पुणे, श्री. डी. सी. पाटील इ. नी नानासाहेबांच्या कामगिरीचा व त्यांच्या निस्वार्थी सेवेचा गौरव करून प्रेमाचे प्रतीक म्हणून त्यांना शाल व श्रीफल देण्यात आले. नानासाहेबांच्या पत्नी सौ. सुंदराबाई या पण या समारंभास हजर होत्या. त्यांचे वय ७५ वर्षे आहे. श्री. रासने यांच्या बद्दलचा उल्लेख श्रीसाईसचरित पोथीत २५ व्या अध्यायात आहे.

5

## सातारचे बालयोगी

# ★ श्री संत गोविंदमहाराज ★

—श्री. गणपतराव सामंत एम्. ए.
व्यवस्थापक, श्रीमहालक्ष्मी संस्थान मुंबई



● 'हरि ॐ बाबा' नामाचा सतत जप करणारे व श्रीसाईबाबांना आराध्य दैवत मानणारे श्री गोविंद महाराजांनी २३ सप्टेंबर १९८१ रोजी बावीसाव्या वर्षात पदार्पण केले. महाराजांविषयी लिहीन असे साईभक्तांना सांगितल्यावर लिहिण्याचा योग आला योगायोगाशिवाय ठरवून अशा गोष्टी घडत नसतात.

काही महिन्यापूर्वीची गोष्ट आहे. श्री गोविंदमहाराज माझे सन्मित्र वांद्र्याचे श्री. जाधव मास्तर यांच्याकडे आले. वेळ रात्रीची होती. महाराज मास्तरांस श्रीमहालक्ष्मी मंदिरात जाण्याविषयी म्हणाले. मास्तर म्हणाले की, "आता रात्रीचे १२ वाजले आहेत आपण उद्या सकाळी जाऊ या. दुसरे दिवशी महाराज व बरीच मंडळी माझ्या घरी आली. मला ऑफिसात निरोप आला की घरी महाराज आले आहेत. वेळ सकाळी १० वाजता.

मी लगेच घरी आलो. बरीच गर्दी जमली होती. साधु–संत, सत्पुरुषांचे चरण प्रथम धरावयाचे हा माझा छंद पण आयुष्यातील हीच प्रथम घटना की मी महाराजांचे पाय धरले नाहीत फक्त उभ्यानेच नमस्कार केला. मनात विचार आला की चमत्कार दिसल्याशिवाय नमस्कार करावयाचा नाही. महाराजांनी मला खुर्चीवर बसावयास आज्ञा केली पण महाराजांसमोर खुर्चीवर बसणे मला अयोग्य वाटले. मी हात जोडून उभा होतो. माझ्या घरात श्रीसाईबाबांचे एक जुने तैलचित्र आहे. त्या खालीच महाराज उभे होते. त्या तसबीरी जवळच एक कमळाचे फूल होते. ते कमळ महाराजांनी हातात घेतले व त्याचा देठ श्रीसाईबाबांच्या चरणी लावला व मला ओंजळ धरण्यास सांगितले. ते कमळ माझ्या ओंजळीत महाराजांनी उलटे केले व आश्चर्य म्हणजे त्या कमळातून तीर्थाची धार लागली. माझी ओंजळ तर भरलीच पण तेथे जमलेल्या सर्व भक्त मंडळीस त्यांनी त्याच कमळातून तीर्थ दिले व ते कमळ परत तसबीरीकडे ठेऊन मला म्हणाले "तुझ्याकडे नेहमी जीवन (पाणी) राहील." त्याचक्षणी मी महाराजांचे पाय धरले.

त्यांच्याविषयी मला पूर्वी माहिती नव्हती. त्यानंतर ज्या ज्या वेळी ते मुंबईस आले त्या त्या वेळी ते येथे माझ्याकडे आले. कसलीच प्रसिद्धी, जाहिरात नसताना महाराज आले की गर्दी होते. मी एका भेटीत त्यांना म्हणालो की महाराज आपण जर कळवून आलेत तर अनेकांना (अर्थात् साईभक्तांना) मी येथे बोलावून घेईन. महाराज नुसते हसले, मी त्यांना म्हणालो की आपण परत कधी येणार. हेतू एवढाच की सर्वांना कळवता यावे. महाराज म्हणाले 'माझी आई (श्रीमहालक्ष्मी) ज्यावेळी बोलवील त्यावेळी येईन. आम्हा साधुसंतांची ती आई आहे.'

माझे साईभक्त सन्मित्र व श्रीशिरडी साईबाबा पिक्चरचे निर्माते श्री. शरद गाळवणकर यांच्याकडे नेहमी संतांची ये-जा चालू असते. नुकतेच श्री गुलाबबाबा, श्री मौनीमहाराज व श्री गोविंदमहाराज त्यांच्याकडे येऊन गेले. सर्वांचे चमत्कार त्यांनी मला सांगितले, विशेषतः श्री गोविंदमहाराजांचे !

श्रीसाईबाबांची आरती चालू होती. इतक्यात एक अपंग मुलगा आपल्या आईवडिलांच्या सहाय्याने आरतीस आला. उभे राहण्याची ताकद नाही. हात-पाय लुळे, श्रीगोविंद महाराजांनी त्यास पुढे येण्यास आज्ञा केली. तो दुबळा मुलगा कसाबसा पुढे आला. महाराजांनी आरती त्याच्या हातात दिली. सर्वांना वाटले ज्याला धड उभे राहता येत नाही त्याचे हात लुळे पडलेले आहे त्याच्याकडून आरती खाली पडणार. पण आश्चर्य-तसे काही झाले नाही. आरती व्यवस्थित पार पडली. तो मुलगा पुढे सुधारला आहे.

श्रीसाईबाबांच्या पुतळ्यास किंवा तसबीरीस भरवणे, खायला लावणे हे नित्याचे चमत्कार अनेक आहेत. एके ठिकाणी मी व एक सुप्रसिद्ध डॉक्टर उभे होतो. श्रीसाईबाबांच्या पुतळयास महाराजांनी भरवले. केळी खावयास लावणे, एकाच केळ्याचा अनेक लोकांस प्रसाद वाटणे. तसबीरीतून सुमधूर तीर्थाची धार लागणे हे प्रकार चालूच असतात.

काहीना तपस्या करून सिद्धी प्राप्त होते. काहीना जन्मजात सिद्धी प्राप्त असते. मला सिद्धीबद्दल काही म्हणावयाचे नाही. पण हल्लीच्या काळात चमत्काराशिवाय नमस्कार नसतो. साधना देणारे सत्पुरुष आहेत पण व्यवहारी कुटुंबवत्सल माणसांना समस्या असतात, व त्या सोडवून साधना देणारे सत्पुरुष विरळाच. अशा सत्पुरुषात श्रीगोविंदमहाराजांची गणना होते.

निरांजनातील ज्योत एक-दोन इंच असते. आरतीच्यावेळी ती ८-१० फूट उंच होणे, उलट सुलट करून तशीच कायम असते. ज्योत आरतीनुसार डोलणे, प्रत्यक्ष तसबीरीतील श्रीसाईबाबांनी डोलणे हे नित्याचे प्रकार अनेक भक्त श्रीगोविंद महाराज आरती करताना अनुभवतात. माणसाला नावाने हाक मारून त्याच्या प्रश्नाचे उत्तर देणे. येथे तर्कवाद, बुद्धिवाद संपतो. मौन निर्माण होते व महाराजांच्या चरणी आपण नतमस्तक होतो.

अशा या संतश्रेष्ठाचा जन्म दि. २३ सप्टेंबर १९६० शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजता झाला. वडिलांचे नाव सुरजमल बंकटलाल, आईचे नाव चंद्रभागा सुरजमल. धन्य ती मातापितरे की ज्यांचा वंशी असे पुत्ररत्न संभवले. जन्मगाव आंबाजोगाई. हल्ली मुक्काम सातारा ( फक्त महाराजांचा ) नेहमी ते सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणे; पण कोणत्या क्षणी तल्लीन होतील व सहजस्थिती सोडतील ते सांगता येत नाही. वाणी सुमधूर एकदा प्रवचन सुरू झाले की काव्यव्युत्पत्ती व तत्त्वज्ञान निर्माण होते.

एकदा आरती चालू होती. आज बाबांना प्रसाद काय तर दूध. दूध नव्हतेच. महाराजांनी एका पेल्यातून थोडे पाणी आणावयास सांगितले व श्रीसाईबाबांच्या समोर महाराजांनी तो पाण्याचा पेला धरला. त्याक्षणी पेल्यातून दुध भरून वाहू लागले. एकदा प्रवचन झाल्यावर त्यांनी अर्धे केळे खाल्ले व उरलेले अर्धे केळे प्रसाद म्हणून वाटावयास सांगितले. ते अर्धे केळे जवळ जवळ चारशे लोकाना वाटून झाले तरी अर्धे केळे कायम !!

श्रीगोविंद महाराजांची श्रीसाईबाबांवर फार भक्ती आहे. ते स्वतःला बाबांचा अवतार समजत नाहीत-भक्त म्हणतात. आपली प्रसिद्धी व्हावी अशी महाराजांची बिलकूल इच्छा नाही. म्हणूनच या लेखास वेळ लागला.

'हरि ॐ बाबा' असा महाराजांनी घोष केला की, समजावे काहीतरी चमत्कार होणार आहे. मी त्यांना एकदा भेटण्यासाठी रात्री काही मित्रांसमवेत गेलो. जणू ते माझी वाट पाहात होते. बराच जनसमुदाय तटस्थ बसला होता. महाराज तल्लीन होते. मला त्यांनी बोलाविले. बरोबर आमचे एक स्नेही होते. त्याच्या पाठीवर हात मारून ते म्हणाले, 'दोन दिन में मोका आयेगा' व आश्चर्याची गोष्ट त्याचे बरेच रेंगाळलेले काम होते ते झाल्याचे दोन दिवसात सरकारी पत्र आले. 'हरि ॐ बाबा' हा जणू त्यांचा मंत्रच आहे. तो म्हणण्यात व ऐकण्यात इतका गोडवा व शक्ति असते की, या बाबतीत प्रत्यक्ष अनुभवच श्रेष्ठ ठरेल.

महाराज चमत्कार करावयाचा म्हणून करत नाहीत तर चमत्कार उत्स्फूर्त घडतोच. लहानपणापासून अनेक साधूसंतांच्या सहवासाचा मला लाभ घडला आहे. येथे श्रीमहालक्ष्मी सन्निध आल्यावर अनेक सत्पुरुष येतात. भेट होते. समाधान वाटते. साधुसंतांची तुलना करू नये. पण श्रीगोविंदमहाराजांविषयी मला फारच प्रेम वाटते, आदर वाटतो याचे कारण ते साईभक्त आहेत, कशाचेच स्तोम नाही. संसारिक व त्रयस्थ लोकांचे प्रश्न चुटकीसारखे सोडवणे हा नित्याचाच त्यांचा कार्यक्रम. संसारिक मनुष्य भक्तिमार्गात पडल्यावर त्याचे प्रश्न असणारच. ते सोडविण्यासाठी प्रवचनांचा उपयोग होत नाही. प्रवचन ऐकून भक्तिमार्ग अढळ करता येईल. पण श्रीगोविंदमहाराजांचा ज्यांना सहवास लाभला त्याला वाटल्यास प्रवचन ऐकावयास मिळेल. वाटल्यास अडचणीतून मुक्तता करून घेता येईल.

ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस । या संतवाणीचा मी आज पुरेपूर अनुभव घेत आहे. उत्कट भक्ती निर्माण झाली की परमेश्वर सहाय्यार्थ उभा राहतो याचे प्रात्यक्षिक मी आज अनुभवीत आहे.

आपला हा आनंद सर्वांस मिळावा म्हणून माझी धडपड चालू असते. म्हणूनच मी श्रीगोविंदमहाराजांस विनंती केली की आपण तुमचा कार्यक्रम जाहीर करू म्हणजे माझ्यासारखे साईभक्त व इतर आपल्या दर्शनाचा लाभ तर घेतीलच व अडचणीतून मार्ग काढतील. त्यांना चमत्कार पहावयास मिळतील. त्यांच्या बाबतीत चमत्कार घडतील. संसार सुखाचा झाल्याशिवाय परमार्थ होणार नाही.

श्रीगोविंद महाराजांना मी बालयोगी म्हणतो. त्यांचे बोलणे, हालचाल पहाण्यासारखी असते. त्यांच्यासमोर उभे राहिल्यानंतर जणू त्यांना सर्व समजले, असे वाटते. जमलेल्या मंडळीतून हाक मारून बोलाविणे हा त्यांचा नित्याचाच चमत्कार आहे.

श्रीगोविंद महाराज नेहमी डोक्याला फडके बांधतात. ते श्रीमहालक्ष्मी मंदिरात कधीहि येवोत गर्दी अचानक होते, यावरून त्यांच्या शक्तीची कल्पना येते. एकदा

रविवारी मला श्री. शरद गाळवणकर यांचा टेलिफोन आला. श्रीगोविंद महाराज मालाडला आहेत ते तुमच्याकडे रात्री आठ वाजता येतील. मी तयारीस सुरूवात केली व वाटले, जर अगोदर आले तर पंचाईत होईल. महाराज चार वाजताच आले. घरात न येताच बाहेरूनच हाक मारली. श्रीमहालक्ष्मीचे त्यांनी दर्शन घेतले व चालावयास लागले. यावरून माझी अडचण त्यांना कळली असावी असेच म्हणावे लागेल.

बरेच वेळा प्रसाद म्हणून महाराज केळे देतात. केळ्याची साल काढताच त्या केळ्यावर ' हरि ॐ बाबा ' कोरलेले आढळते असा बऱ्याच भक्तांचा अनुभव आहे. एक न संपणारी मालिका म्हणजेच महाराजांचे चमत्कार.

ते चमत्कार एकसारखे करतात. म्हणून महाराज प्रसिद्धी पावत नाहीत तर चमत्कार आपोआपच घडतात व त्याचवेळी अनेक भक्तांचे प्रश्न सुटतात. नेहमी महाराज थट्टा-विनोद करताना दिसतात. बरोबर बाळ-गोपाळ मंडळी असते. पण एकदा संचार झाला की महाराज दैवी दिसतात. श्री साईबाबांवर त्यांचे प्रेम आहे.

संतांची परीक्षा कोणी घेऊ नये त्याचप्रमाणे तुलना करू नये. आपणास पटत नसेल तर मार्ग सोडावा.

श्रीसाईबाबांवर माझे निस्सीम प्रेम आहे. माझा वशिला तोच- त्यामुळे अनेक साधु-संतांच्या भेटी होतात. श्रीराऊळमहाराज, श्रीसेवकमहाराज, श्रीभालचंद्रमहाराज यांचा सहवास मला लाभला. श्रीसत्यसाईबाबांबरोबर बोलण्याचा योग आला.

श्रीगोविंदमहाराजांविषयी लिहिण्याचा मनोदय अनेक दिवस होता पण योग आता येत आहे. शिरडीस जाण्यासाठी योग यावा लागतो, संतांची भेट होण्यास योग हवा. या गोष्टी ठरवून करता येत नाहीत. आपले परमेश्वराविषयी प्रेम वाढले की सर्व योग येतात व आनंद मिळतो.

श्रीगोविंदमहाराजांचा जन्म जरी आंबाजोगाईस झाला व जरी त्यांचे आई-वडील तेथे असले तरी महाराज सातान्यास राहातात व त्यांची भ्रमंति चालू असते. माझ्यावर त्यांचे प्रेम आहे. मला त्यांचा आशिर्वाद लाभला.

एवढीच एक उत्कट इच्छा की, अशा या बालयोग्याचे दर्शन सर्व भक्तांनी घ्यावे. संत मालिकेच्या क्षितिजावर तळपणारा असा हा दैदिप्यमान तारा सर्वांस तारक व्हावा अशी श्रीसाईबाबांकडे मनोमय प्रार्थना !

★

# आमचे श्रीसाईबाबा संस्थान वाचनालय

## ( हेमाड पंत वाचनालय )

— सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

● श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी या जगप्रसिद्ध देवस्थानाचे, तीर्थ क्षेत्राचे एक सुंदर वाचनालय पण आहे. श्रीबाबांच्या दर्शना करिता भक्त जशी गर्दी करून सोडतात तशीच गर्दी या वाचनालयात पण वाचक करतात. सध्या शांती निवास या नवीन भक्तांना रहाण्यासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीच्या तळमजल्यावरील पूर्वेकडच्या कोपऱ्यात हे वाचनालय आहे. भक्तनिवास या इमारतीचा अगदी दक्षिण कोपरा या वाचनालयाच्या अगदी जवळ येतो.

या वाचनालयाला एका वेळी "हेमाडपंत वाचनालय" असे नाव देण्यात आलेले होते. बाबांचे एक निकटभक्त व ज्यांनी श्रीबाबांची श्रीसाईसच्चरित ही परम पवित्र पोथी लिहिली त्या पोथीचे चरित्रकार कै. श्री. गोविंद रघुनाथ दाभोलकर यांनी हे वाचनालय बाबांच्या हयातीत सुरू केले आहे. दाभोलकरांना श्रीबाबा सहेतूकच 'हेमाडपंत' या नावांनी हाक मारीत असत. हेमाडपंत हे नाव मोडी लिपीच्या जनकाचे नाव होय. ते सेवानिवृत्त मामलेदार व वांद्र्याचे निवासी प्रथमवर्ग न्यायमूर्ती होते त्यांचेकडे २०-२५ अध्यात्मिक ग्रंथ, व काही साधुसंताची चरित्रे, इ. पुस्तके होती व त्या पुस्तकांच्या गोळा बेरजेवरच त्यांनी वाचनालय उघडण्याचे सतकृत्य त्यावेळी केले.

अगदी पूर्वी हे वाचनालय दिक्षित वाड्यात होते. नंतर ते संस्थानचे मुख्य कार्यालय जिथे आहे तिथे याची सोय लावण्यात आली. यानंतर काही वर्षे हे वाचनालय समाधी मंदिराच्या बाहेरच्या प्रांगणात सुरक्षा विभाग जिथे आहे त्या विभागाच्या पाठीमागील बाजूला म्हणजे समाधी मंदिराच्या दक्षिण दरवाजाच्या अगदी सुरवातीलाच एक लहानशा खोलीत होते. याच खोलीत सध्या स्वच्छता विभागाचे कार्यालय आहे. वाचनालय येथे असताना संस्थानचा प्रकाशन विभागही सुरू झालेला होता व या वाचनालयात संस्थानची प्रकाशित पुस्तके, पोथ्या, श्रीबाबांची लहानमोठी रंगीन अशी चित्रे विक्रीस पण ठेवलेली असत.

अगदी सुरुवातीला या वाचनालयाची व्यवस्था स्वतः श्री. दाभोलकर बघत स्सत. संस्थान कमिटीच्या वेळी श्री. खडकतकर नावाचे सज्जन या वाचनालयाची

व्यवस्था पहात असत. त्यांनी हे कामकाज व्यवस्थित व सुरळीतपणे व्हावे यासाठी श्री. नांदे नावाचे एक लिपीक नेमले होते. श्री. नांदे हे गेल्यानंतर श्री. विठ्ठलराव विष्णूपंत बागवे यांचे या वाचनालयाचे व्यवस्थापक म्हणून १ मार्च १९५९ पासून नेमणूक करण्यात आली. त्यांनी वाचनालय भरभराटीला आणून भक्तांसाठी अधिकाधिक धार्मिक ग्रंथ वाचनालयात आणले. या पुस्तकांबरोबरच काही दैनिके, साप्ताहिके, मासिके यांची पण वाचनालयात त्यांनी व्यवस्था केली. याच वाचनालयात संस्थानने प्रकाशित केलेल्या पुस्तकांची, श्रीसाईसच्चरित्र पोथीची व श्रीबाबांच्या लहानमोठ्या आकारातील रंगी-बेरंगी चित्रांची पण विक्री करण्यात येऊ लागली. श्री. बागवे हे काम, मंदिर प्रमुखाचे काम व जबाबदारी सांभाळून करीत असत. यामुळे त्यांचा संपूर्ण दिवस सकाळी ४–३० वाजल्यापासून तो रात्री अकरा वाजेपर्यंत अगदी भाऊगर्दीत जात असे. स्वस्थता व विश्रांती त्यांना अजिबात मिळत नसे आणि म्हणूनच की काय १–१–१९८१ पासून त्यांचेकडील वाचनालयाची प्रमुख पदाची जबाबदारी कमी करण्यात आली व ७–७–८१ पासून भांडार प्रमुख श्री. शंकरराव एकनाथ जोगस यांची वाचनालय व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्यात आली. व मंदिर विभाग श्री. बागवे यांचेकडेच स्वतंत्रपणे ठेवण्यात आला आहे. सध्या वाचनालयात एक ग्रंथपाल श्री. शिखरचंद बाबूलाल कासलीवाल, एक पुस्तक विक्री लिपिक– श्री सुरेश श्रीरंग जोरी, दोन शिपाई—बाळा लहानू साबळे व नारायण केशव कुलकर्णी यांची नेमणूक करण्यात आली आहे १९५९ ते १९८० अशी २१ वर्षे श्री बागवे यांनी वाचनालय व्यवस्थापक म्हणून काम पाहिले

शांतिनिवास या नूतन इमारतीत दिनांक १२–१०–१९७५ पासून हे वाचनालय सुरू करण्यात आले आहे ज्या जागेत हे वाचनालय आहे त्या जागेची लांबी ४० फूट व रुंदी १७ फूट आहे. वाचनालयात बसण्यासाठी बाके खुर्च्या असून धूम्रपानास तिथे बंदी आहे. स्टँडला अडकवण्यात आलेली वर्तमानपत्रे उभ्यानेच वाचता येतात. या वाचनालयात पुस्तक प्रकाशन विक्रीसाठी एक स्वतंत्र चौकीच करण्यात आली असून या चौकीच्या बाहेरच्या बाजूस नवीन नवीन प्रकाशने अडकवण्यात आली आहेत. सध्या वाचनालयात १३५८ मराठी पुस्तके, ५८५ इंग्रजी पुस्तके व ७१९ इतर भाषेतील पुस्तके इ. मिळून २६६२ पुस्तके आहेत. श्रीसाईलीला मासिकाचे सर्वच्या सर्व अंक पहिल्या अंकापासून तो आजतागायत व्यवस्थित बांधणी करून ठेवण्यात आले असून अभ्यासूना ते तिथे वाचनासाठी मिळतात. वाचनालयात १२ दैनिके, ९ साप्ताहिके व २० मासिके सध्या चालू आहेत. याशिवाय देणगी म्हणून इतर १५–२० मासिके येत असतात. वाचनालय आठवड्याचे सर्वच्या सर्व दिवस चालू असून वाचनालयाची वेळ सकाळी ८ ते १२–३० व दुपारी ४ ते ७–३० अशी आहे. कुणाही वाचकाला वाचनालयातील पुस्तके बाहेर नेता येत नाहीत. 卐

# भक्ती — भक्ती — भक्ती

—डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरा निवास, लालबहादूर शास्त्री मार्ग
कुर्ला, मुंबई ७०

● ज्ञान होण्यापूर्वी (१) साधन भक्ति व (२) ज्ञानोत्तर साध्यभक्ति वेगळाल्या दोन भक्ति किम् कसे !

भक्तीमध्ये ज्ञानोत्तर अगर ज्ञानपूर्व असे विभाग करता येणार नाहीत. शास्त्र पद्धतीने नवविधाभक्ती, चतुर्विधाभक्ती असे वेगवेगळे प्रकार वर्णन केले आहेत. पण कर्मदृष्टि ज्यांची आहे, जीवाने श्रीहरि मिळविण्यास साधने केली पाहिजेत असे जीवकर्तृत्व जी शास्त्रे लादतात त्यांचे ते उद्गार आहेत. संतअनुभवाप्रमाणे भक्ती एकाच प्रकारची असू शकते; ती जीवाला करण्यासारखी कर्मकर्तृत्वाची गोष्ट नव्हे. ती जाणून अंतरी श्रीहरिसत्तेने उमलण्याची प्रेमकल्लोळ अवस्था आहे.

गीतेमध्ये चतुर्विधा भक्तीचे (आर्त, जिज्ञासू अर्थार्थी आणि ज्ञानी) वर्णन झाले आहे. पण तेथेच त्या चारहि भक्तींचे निराकरण केले आहे.

एरव्ही तिजी ना चौथी । हे पहिली ना सरती ।
पै माझी हे सहजस्थिती । भक्तीनाम ॥ १८–१११३ ज्ञानेश्वरी

भक्तिचे वर्णन ज्ञानेश्वरीत पुष्कळ ठिकाणी आले आहे.

अ. ११ परि तेचि भक्ती ऐसी । पर्जन्याची सुटिका जैसी ।
धारांवाचुनि अनारिसी । गतिंचे नेणे ॥
का सकळ जळसंपत्ति । घेऊनि समुद्राते गिवसिती ।
गंगा जैसी अनन्य गति । मिळालीचि मिळे ॥ ११–६८७

वरील दृष्टांताप्रमाणे जेथे अनन्यता तेथे भक्तीचे रुप आहे, असे स्पष्ट मांडले आहे. अठराव्या अध्यायात अनन्य शरण येणे म्हणजे काय याचे स्पष्टीकरण—

पै आपुलेनि भेदेवीण । माझे जाणिजे एकपण ।
तयाचि नाव शरण । मज येणे गा ॥ १८–१३९८

प्रभुशी जीवाचे एकत्व आहे; त्या एकत्वात प्रभुच जीवाशी मिळून गेला आहे. तोच जीवाचे जीवपण व प्रियसुख सांभाळीत आहे. हे जीवात निश्चितीने, कळकळीने वाटणे हीच अनन्यता जीवाला असू शकेल.

भागवत धर्म—म्हणजे संतांचा अनुभव. त्याप्रमाणे जीवाला देवाची भक्ती करता येण्यासारखी नाही; देवच जीवाची भक्ती करत आहे, जीवाला फार तर ती प्रभूने जीवाची केलेली भक्ती जाणता येईल. जो समर्थ आहे तोच त्यावर अवलंबून असेल; त्यांची भक्ती-सेवा करू शकेल. आईच बाळाची सर्व सेवा करते. तीच बाळाची भक्ती करू शकेल. बाळाला आईचे काय करता येईल बरे ?

तुकाराम महाराज म्हणतात—
काय आम्ही भक्ती करणे ते कैसी
काय वहावे तुम्हासी
अवघा भरूनी उरलासी
वाणी खाणी रसी रुपी गंधी

ज्या जीवनाच्या आधारावर कोणतीही गोष्ट करावयाची तेच तो सांभाळून भक्ती करत आहे तेथे आम्हाला कोणती भक्ती करता येईल ?

मायबाप ज्या प्रेमाने सांभाळीत, क्षणाक्षणाला जगवीत व नित्य नवे ज्ञान देत भक्ती करत आहेत ते ओळखणे ते प्रभूचे जीवाशी एकपण जाणून अनन्य होणे हीच भक्ती आहे. भक्ती हे कर्म नसून अंतरीची प्रिय आवड आहे. जीवाला कर्म करायला सांगता येईल; पण आवड अगर प्रेम कर म्हणून ती करायला सांगण्यासारखी गोष्ट नव्हे. ती प्रभूनेच दिली पाहिजे. प्रेम देवाचे देणे । देहभाव जाय जेणे ॥ संतांच्या संगतीत त्यांच्या प्रेमचैतन्याला आपल्या चैतन्याचा दीप लागून आपले चैतन्य प्रेममय म्हणजे प्रभू जीवाची प्रियभक्ती कशी करीत आहे या जाणिवेने जीव घायाळ होईल. हे जीवावर व्यक्त होत असलेले व जीवाच्या ध्यानी ते येऊन प्रेममय प्रभू त्याच्या अंगी जागा होण्याचे रूप हीच भक्ती होय. त्याचे नवविध प्रकार करता येण्यासारखे आहेत काय ? किंवा चतुर्विधा तुकडे होतील काय ? प्रेमभक्ती ही हृदयव्यथा आहे. ती सर्वकाळ एकच जातीची आहे; आणि ती प्रभूकृपेने त्याची भक्ती जिवितात उमलून भेटावयाची आहे. त्याला ज्ञानाच्या अगोदर का नंतर असे दोन रंग कोठे शोधाल ? या प्रिय भक्तीत (आणि प्रियत्व नाही ती भक्ती नाही, ते कर्म असेल) जाणता अगर नेणता दोघेही तितकेच घायाळ असतात. किंबहुना नेणत्याला प्रभू अधिक ओढीने जवळ करतो. श्री तुकाराम महाराज देखील "जाणीव शिणकारी" म्हणून म्हणाले.

"आगी लागो जाणपणा । आड न यो नारायणा ॥"

भोळीभाळी जनाबाई प्रभुला केवढी प्रिय झाली ! ज्ञानी लोक उलट विचार करण्यातच वाद करीत जगाला जिंकण्याच्या ईर्षेने स्वतःच प्रेमदरिद्री झाले.

ज्ञानोत्तर भक्ती, नवविधा भक्ती, चतुर्विधा भक्ती हे शब्द वेदांती शास्त्रमार्गी लोकांचे आहेत. प्रिय प्रेमळ भक्ताच्या क्रिया पाहून त्यांनी त्यावर अनुमाने बसविलेले विचार आहेत. सगुण भक्ताला आपल्या प्रभुला प्रेमस्फूर्तीने पूजन करावे वाटले, वंदन करावे वाटले, गोड गोड गोष्टी बोलाव्या वाटल्या, त्या एक एक क्रिया त्या प्रेमभावात न बुडालेल्या एखाद्या तार्किक बघ्याने पाहिल्या किंवा कल्पनेने जाणल्या आणि त्याचे शास्त्र करून ठेवले. वास्तविक त्याच्या प्रिय देवतेशी वेगळाल्या क्रियांनी त्या भक्ताने आपले प्रेमच भोगले ना ? क्रिया बाह्यतः भिन्न दिसल्या तरी अंतरीची आवडीची एकच जात होती ना. भागवत धर्म अंतरीच्या त्या वेध अन्यतेला भक्ती हे नाव देतो आणि तो वेध जीवाला कर्माने, क्रियेने आणता येणे शक्य नसून ती आवड प्रभूच्या अनन्य रूपाची जाणीव होऊन त्याच्याच कृपेने उदित व्हावयाची असे सांगतो तर इतर शास्त्रे बाह्य क्रियांवरून अंतरी भक्ती ( आवड ) निर्माण होईल अगर असेल अशी ग्वाही देतात. बाह्य क्रियेवरून भक्तीला वेगळाली नावे द्यायची तर ती अनंत होतील. आई मुलाच्या भक्तीने जेवढ्या क्रिया करते ती ती क्रिया वेगवेगळाली भक्तीच होईल.

चतुर्विधा काय किंवा नवविधा काय, बाह्यक्रियेवरून दिलेली नावे आहेत. अंतरीच्या रुपाने तिजी ना चौथी–एकच प्रियभक्ती हे ध्यानी यावयाला पाहिजे.

ज्ञान होऊन नंतर भक्ती ती ज्ञानोत्तर भक्ती ही गोष्ट अशीच दिशाभूल करणारी आहे.

भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान । भक्तीमाय त्यासी करीतसे जतन ॥

जीवतत्त्व हेच प्रियत्व आहे. ज्ञान असो वा नसो स्वतःला अनिवार प्रियता आहे. तेच जीवावरील प्रभुचे प्रेम त्या स्वप्रियेस्तव स्वसंरक्षण कसे काय करावे ; ही प्रियत्वाची क्रिया अगर एक अंगविकार ते ज्ञान होय.

ज्ञान म्हणजे मोक्षस्थिती असे कल्पून त्याहीनंतर भक्ती असते; तिला काही जण ज्ञानोत्तर भक्ती अगर मोक्षावरील भक्ती असे म्हणतात. संतांनी मोक्षावरील गुरुभक्ती असे भागवतादि ग्रंथात म्हटले आहे. पण त्याचा तरी अर्थ एवढाच की—

तुका म्हणे मोक्ष राहे ऐलीकडे । दुर्लभ ते पाय विठोबाचे ॥

मोक्ष म्हणजे विषय, पदार्थ यांची आसक्ती न राहणे पण अनासक्ती म्हणजे प्रभुप्रेम, प्रभुऐक्य नव्हे. ती प्रियता जेथे ती गुरुभक्ती, मोक्षावरील म्हणजे ज्ञानोत्तर भक्ती असा शब्दयोग कोठे असला तरी त्याने बिचकून जाऊ नये.

भक्ती ही एकच आहे. ती प्रभुप्रियता आहे. प्रभुशी संगम असलेले अनिवार प्रेम आहे. अनन्यता ही त्याची बाह्य खूण असून प्रियताविरह ही तिची अंगे आहेत. ती जीविताची, स्फुरणीची सुखदु:खमिश्रित प्रिय दशा आहे. ती भोगावस्था आहे. तिच्या क्रियांवरून नावे देण्यापेक्षा तिचा अंतरात उदय भोगणे हेच तिचे रुप ओळखण्याचे एकमेव साधन आहे. ती प्रिय भक्ती नामस्मरणात अगर संतसंगतित अनुभव रुप जीवात उमलू शकते. देहाला कष्ट देऊन व नाक, डोके घासून त्या प्रिय भक्तीला हमालीप्रमाणे घडणाऱ्या साधनांच्या पंक्तीला नेऊन बसवू नये. अंतरी प्रभु-प्रियता जागी होऊन मग मात्र वंदन, दर्शन अगर कोणतीहि प्रिय कर्मे घडतील ती ती भक्तीच आहे. थोडक्यात कर्माने प्रेम अशी भक्तीची व्याख्या नसून प्रेमाने घडेल ते कर्म अशी आहे. ती प्रिय विरहावस्था आहे एवढेच.


## श्रीसाईलीला काव्यबहार विशेषांक

श्रीसाईलीला मासिकाचा श्रीसाईकाव्य बहार अंक श्रीसाईलीला मासि-काच्या आठव्या लेखक–कवी स्नेह संमेलन प्रसंगी शिर्डीस अध्यक्ष महोदयांचे शुभहस्ते प्रकाशित होणार. प्रकाशन तिथी ३१ जानेवारी १९८२ सकाळी ९ वा.

नामांकित श्रीसाईभक्तांच्या पन्नासावर भावमधुर कवितांचा संग्राह्य समूह

**पृष्ठे ६४ :** **: किंमत अवघी १ रु.**

**वि. सू.** या खास अंकासाठी कुणीही कविता पाठवू नयेत, त्या स्वीकारल्या जाणार नाहीत.

# ॥ भगवान श्रीसाई ॥

-श्री. बाळकृष्ण अ. देसाई
भांगरवाडी, लोनावळा (पूर्व)

● आपला भारत संत महंतांचा देश. या देशात आसेतु हिमालय थोर थोर महात्मे होऊन गेले. त्यांच्या लीला जशा अद्‌भुत तशाच त्या दैवी चमत्कारानी भरलेल्या होत्या.

१) सन सतराशेच्या मध्यात पैठण शहरी एकनाथ नावाचे महान संत होऊन गेले. त्यांची आपल्या गुरूवरील भक्ती जाज्वल्य होती. जनार्दन स्वामी हे महान दत्तभक्त. प्रत्यक्ष देव त्यांना दर्शन देऊन, त्यांच्या मांडीला मांडी लावून तासन्‌तास त्यांच्या शेजारी बसून बोलत असत. नाथांची आपल्यावरील एकनिष्ठ भक्ती पाहून प्रसन्न होऊन जनार्दन स्वामीनी नाथाला प्रत्यक्ष दत्ताचे दर्शन घडवून दिले. तसेच मानवी रूपात श्रीदत्त स्वामींची सोबत करीत असत, हेही दाखवून दिले. असे जरी घडत होते तरी, नाथ कधीच हुरळून गेले नाहीत की, त्यांच्या निष्ठेत फरक जाणवला नाही. त्यांचे स्थान गुरूच्या पायापासून लेशभरही ढळले नव्हते.

नाथ प्रतिवर्षी गोकुळअष्टमी नि फाल्गुन वद्य षष्ठी हे दोन उत्सव धूमधडाक्याने साजरे करीत असत. फाल्गुन व ॥ ६ हा त्यांच्या गुरूचा-जनार्दन स्वामींचा-जन्मदिन तसाच तो त्यांचा समाधि दिन. त्या दोन उत्सवात ते साऱ्या विद्वान ब्रह्मवृंदांना तसेच सर्व थरातील नि धर्मातील आबाल वृद्धांना तल्लीन करून सोडीत.

एकदा असे झाले, द्वारकेहून एक ब्राह्मण पैठणकडे यायला निघाला. तो विद्वान होता. पैठण शहरात प्रवेश केल्यावर त्याने नाथांच्या वाड्याची चौकशी केली. लोकांनी त्याला नाथांच्या वाड्यात अचूक आणून सोडले.

ब्राह्मण नाथासमोर येऊन उभा राहिला. नाथानी लगबगीने उठून त्याला प्रेम भावे प्रतिनमस्कार करून म्हटले, 'आपण कुठून नि का येणे केलेत माझ्याकडे ?'

ब्राह्मण नाथांच्या पायाशी बसला. त्याला धरून उठवीत म्हटले, 'आपण नतमस्तक होऊन माझ्या पायापाशी आसनस्थ झालात हे कसे काय योग्य ठरेल ? छे, छे ! पागोळ्याचे पाणी कधीतरी आढ्याकडे वळलय का ? मीच आपणाला त्रिवार वंदन करायला हवे. !

'मी आहे एक पोटार्थी गरीब ब्राह्मण द्वारकेत राहातो. आपल्या गुरुनिष्ठेच्या गोष्टी ऐकून, हातून आपली काही सेवा घडावी म्हणून इथे धाव घेतली. आपल्या सान्निध्यात असलो, म्हणजे ज्ञानाची मेजवानी तर मिळेलच, शिवाय पोटापाण्याचीही काळजी मिटेल!'

'तुम्ही माझी कसली सेवा करणार? माझे ज्ञान, भाग्य थोडेच मोठे आहे? उलट मीच आपली मनोमन सेवा करणे योग्य ठरेल. अन् ती रोज मी आनंदाने करीत जाईन! पण अगोदर आपले नाव समजले तर बरे!'

'मला श्रीखंड्या म्हणतात. आपला निरंतर सहवास लाभावा म्हणून इथे धाव घेतली. आपले पडेल ते काम अहोरात्र करायला कधीच मी कुरकूर करणार नाही. पगाराची वगैरे कसलीच अट किंवा मागणी नाही. पोटाला मिळाले की बस्! अट एकच! आपला निरंतर सहवास लाभावा. त्यात कधीच अंतर पडू नये.'

'काही हरकत नाही. आपलेच घर समजून आनंदाने राहा. मात्र आपण माझी सेवा करण्याऐवजी मला आपली सेवा करणे अधिक पसंत पडेल.'

श्रीखंड्या नाथाघरी राहिला. त्याचा सबंध दिवसाचा कार्यक्रम ठरून गेला. सकाळी उठावे. कावड घेऊन गोदेवर जावे नि पाणी आणावे, पूजेसाठी फूल-पत्री वगैरे साहित्य गोळा करावे, गंध उगाळावे, उष्टी खरकटी काढावी, तसेच इतर हलकी-सलकी कामे मनःपूर्वक करून नाथांच्या भजन कीर्तनात रमून जावे. असे कित्येक दिवस अव्याहत चालले होते.

इकडे द्वारकेला एका विद्वान ब्राह्मणाने भगवंताच्या दर्शनासाठी दीर्घ अनुष्ठान चालविले होते. एक तप उलटले तरी भगवानाची भेट होत नाही, ह्या निराशेने त्या ब्राह्मणाने हवा पाण्याशिवाय इतर सर्व वस्तु वर्ज्य करून एके ठिकाणी ठाण मांडून घोर तपाला सुरवात केली.

अखेर भगवान एके दिवशी त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाले, 'सध्या मी पैठणला नाथाकडे श्रीखंड्या नावाने वावरत आहे. तिथेच तुला माझे दर्शन होईल!'

ब्राह्मण सुखावला, नि पैठणला यायला निघाला. मजल दरमजल करीत अखेर तो पैठण शहरी आला, नि चौकशी करून नाथांच्या वाड्यात शिरला.

ब्राह्मणाने वाड्यात पाऊल टाकताच श्रीखंड्याने त्याला ओळखले. पण त्या ब्राह्मणाला श्रीखंड्यारूपी भगवंताला काही ओळखता आले नाही. त्याने त्याला-श्रीखंड्याला-म्हटले, 'माझी नाथाशी भेट करवून दे!'

नाथांना ब्राह्मण भेटला नि म्हणाला, 'आपणच नाथ ना! मग आता मला श्रीकृष्ण भगवानाची भेट करवून द्या!'

'अहो, भगवान तर सर्वत्रच आहे. तुमच्या माझ्यात नि इथे असलेल्या प्रत्येक वस्तूत त्याचे वास्तव्य असता, आपणाला मी दुसरा कुठचा देव दाखवू?'

'महाराज, हे झाले तत्त्वज्ञान मी इतक्या लांबून हजारो मैलांचा मुलूख तुडवून मुद्दामच आलो देवाला भेटायला तुमच्याकडे तो तुमच्या घरी श्रीखंड्या नावाने वावरतोय ना, तोच मला भेटायला हवा!'

ब्राह्मणाच्या तोंडचे शब्द कानी पडताच नाथ आश्चर्यचकित झाले.

'अहो, त्यानेच आपणाला मजकडे आणून सोडले. थांबा हाक मारतो.'

नाथांनी श्रीखंड्याला हाका मारल्या, पण तो होताच कुठे तिथे? तो तसाच दुसरीकडे पसार झाला. ब्राह्मण चुकचुकला. निराश झाला. 'श्रीखंड्याला आपण ओळखलं नाही. नाथांचा गडी समजलो. अनुष्ठान थिटे पडले!'

२) भक्ताच्या हाकेला धावून जाणारे असेच होते आपले सद्गुरू भगवान साईबाबा! नानासाहेब चांदोरकर खानदेशात जामनेर तालुक्याच्या ठिकाणी मामलेदार होते. तिथे त्यांनी आपल्या मुलीला बाळंतपणासाठी आणली होती. तिचे दिवस भरून पोट दुखू लागले. भयंकर कळाही येऊ लागल्या. सुईणी, वैद्य, डॉक्टर यांनी उपचाराची पराकाष्ठा केली. पण कुणाच्याच औषधांनी गुण पडला नाही. उलट भयंकर वेण्या येऊ लागल्या. नानासाहेब घाबरले नि त्यांनी बाबांचा धावा केला.

नानासाहेब बाबांचे परमभक्त. जामनेरला चाललेली सारी उलघाल नानासाहेब्या हाकेसरशी बाबांच्या डोळ्यासमोर नाचू लागली. बाबा अस्वस्थ झाले. त्यांनी शाम्याला–माधवराव देशपांड्यांना–बोलावून घेऊन आरती नि उदी, बापूगीर गोसावी याजबरोबर नानासाहेबांकडे त्वरित पाठवून देण्यास सांगितले.

रामगीर हे गोसाव्याचे नाव. बाबा त्याना बापूगीर म्हणत. ते होते बाबांचे निष्ठावंत भक्त. त्याच सुमारास ते आपल्या गावी जायला निघाले होते. बाबांचा आशीर्वाद नि उदी मागण्यासाठी ते बाबांसमोर येताच बाबा त्याला म्हणाले, 'तू गावी जातोसच तर आधी ही आरती नि उदी घेऊन जामनेरला नानासाहेबांकडे जा, अन् मग तिथून तू आपल्या गावी घरी जा!'

बाबांनी आपणास जामनेरला पाठवू नये, म्हणून बापूगीरने बाबांना खूप विनविले. पण बाबांनी त्याला निक्षून जाण्यास सांगितले, नि म्हटले, वाटेत तुझी सारी सोय होईल! पैशा अडक्याचा, खाण्यापिण्याचा कुठेच कसलाही अडथळा येणार नाही. चल, नीघ!'

बापूगीरनी शिरडी सोडली, नि आगगाडीने जळगाव स्टेशन गाठले. खाली उतरले तो सर्वत्र अंधार. कुठेच त्याना टांगा किंवा हमाल दिसेना. बरं, खिशात दोन आण्यापलीकडे पैसा नाही. आता कसे जायचे पुढे! त्याना मोठा विचार पडला. तोच पॅसेंजरांच्या गर्दीतून 'इथे कुणी शिरडीतून आलेले बापूगीर आहेत का?' असे ओरडत, शोधीत शोधीत, एक माणूस त्यांच्यापुढे दत्त म्हणून उभा राहिला.

'मी–मी बापूगीर! पण आपण कोण?'

'अगोदर चला! मगच बोलू! ही पाहा घोडा गाडी आपलीच वाट पाहात आहे. आपणाला नानासाहेब मामलेदारांकडे जायच आहे ना?'

'होय!'

'मग बसा की गाडीत!'

बापूगीर गाडीत बसले. प्रवास सुरू झाला. जामनेरजवळ येताच पहाट झाली. बापूगीरच्या पोटात भुकेने कावळे कोकलू लागले. गाडीवान म्हणाला, 'हा पहा जवळच एक चांगला ओढा वाहातोय. आपण तिथे उतरू नि हा फराळाचा डबा खाऊ! नानासाहेबांनीच मला आपणाला घेऊन येण्यास हा फराळाचा डबा नि घोडागाडी देऊन पाठविले!'

बापूगीरना आश्चर्य वाटले. नानासाहेबांना माझे येणे कळलेच कसे? शिवाय गाडीवानाच्या बोलीवरून त्यांना ते मुसलमान वाटला. पण होता तो राजस्थानी हिंदु. बापूगीरना त्याच्या धर्माची खात्री पटल्यावर दोघे खाली उतरले. डबा बापूगीरच्य स्वाधीन केला. खाऊन झाल्यावर गाडी सुरू झाली. त्यानंतर गाडीवाल्याने बापूगीरना मामलेदारांच्या कचेरीजवळ आणून सोडले. बापूगीर लघुशंकेकरिता जरा दूर बाजूला गेले. परतले तो काय चमत्कार! तिथे ना घोडागाडी नि ना गाडीवान! त्यांनी खूप शोधाशोध केली, पण सारे व्यर्थ! तो एक मोठाच चमत्कार होता.

सकाळ उजाडली. बापूगीर तपास करीत करीत नानासाहेबांकडे आले. त्यांनी बरोबर आणलेल्या वस्तु नानासाहेबांच्या स्वाधीन केल्या, आणि म्हटले, आपण टांगा नि फराळाचे स्टेशनवर पाठविलेत म्हणून मी इतक्या लवकर आलो. नाहीतर फारच त्रास झाला असता. हे ऐकताच नि बाबांनी पाठविलेल्या वस्तु पाहाताच त्यांना मोठेच आश्चर्य वाटले. पण यात आश्चर्य होतेच कुठे? सर्व व्यापी नि सर्व ज्ञानी बाबांचाच हा चमत्कार! त्यांनी अंतर्ज्ञानाने माझी अडचण जाणून हे सारे केले. अन् मग आरती गाऊन उदी लावल्यावर विना सायास मुलगी सुखरूप प्रसूत झाली. सारे घर आनंदात डुंबून गेले. असे प्रत्येक भक्ताघरी श्री बाबांचे अस्तित्व प्रत्येकाला जाणवत असले.

नाथांच्या एकनिष्ठ भक्तीला भाळून भगवंताने पाणक्याचे काम पत्करून नाथाघरी ' श्री खंड्या ' नावाने पडेल ते काम केले. श्रीबाबांनी नानासाहेबांच्या अनन्य भक्तीने गाडीवानाचे रूप घेऊन बापूगीरला आरती नि उदी पोहोचविण्यास मदत करून त्यांची भीति तर घालविलीच, उलट त्यांच्या घरी आनंदाचे साम्राज्य निर्माण केले.

देवाने भक्ताघरी जे केले, तेच बाबांनी प्रिय भक्तावरील काळजीचे सावट दूर करण्यासाठी केले. हाच बाबांचा सर्वगामी देवपणा ! ते म्हणत, 'If you cast your burden upon me, I shall bear it !' नानासाहेबांच्या बाबतीत त्यानी आपले ब्रीद अक्षरशः खरं नाही का केलं ?

★

# * भक्ती-भाव *

—श्री. भालचंद्र ल. पोटकुळे
आनंद कोळीवाडा, मुंब्रा, ठाणे

● '**झडझडौनि वहिला निग । इये भक्तीचिये वाटे लाग ।**' हे विश्व आभासात्मक आहे. यातील सर्वच व्यक्ती व वस्तू अनित्य आहेत. हे जाणून श्रीकृष्णाने अर्जुनाला वरील उपदेश केला.

शंभर ठिकाणी फुटलेल्या नावेत बसून निश्चिंत होता येत नाही. शस्त्रांचा वर्षाव होत असताना कवच ( चिलखत ) नसून चालणार नाही, दगड अंगावर पडत असताना मध्ये ढाल न धरून चालणार नाही, रोगांनी घेरले असता औषधाविषयी निष्काळजी राहून चालणार नाही; चारी बाजूंनी वणवा पेटला असता तेथून बाहेर न पडून चालत नाही, त्याप्रमाणे संकटांनी भरलेल्या ह्या मृत्युलोकात येऊन परमेश्वराला न भजून कसे चालेल ? सारांश, जग नश्वर आहे आणि अनंत दुःखांनी भरलेले आहे, तेव्हा परमात्मा भक्ती हेच अनिवार्य साधन ठरते.

जे भक्त एकनिष्ठ अंतःकरणाने परमेश्वराचे चिंतन व उपासना करतात ते इतके भाग्यवान असतात की त्यांची सेवा स्वतः परमेश्वरच करतो. मग ते भक्त जी जी इच्छा मनात धरतात ती ती इच्छा परमात्मा पुरवतो व त्यांचे रक्षणही करतो. इतकेच नव्हे, तर त्यांचा सगळा योगक्षेमही तोच चालवतो.

पण परमात्म्याला विसरून अन्य देवतांची भक्ती करणारे खऱ्या अर्थाने परमेश्वराचे व्यापक स्वरूप न ओळखता भक्ती करतात, त्यामुळे ते परमात्म्याशी येऊन पोचत नाहीत. वृक्षाच्या फांद्या आणि पाने ही जरी एकाच बीजाची असली तरी पाणी घालताना ते मुळाशीच घातले पाहिजे. सुग्रास कानात घालून काय उपयोग ! रस हा मुखानेच सेवन केला पाहिजे. सुवास नाकानेच घ्यायला हवा. त्याप्रमाणे परमात्मा हा परमात्मा म्हणूनच पूजायला पाहिजे.

परमात्म्याला आत्मार्पणावाचून काहीही आवडत नाही. तो अन्य बाह्य उपचारांनी प्राप्त होत नाही. त्याच्या प्राप्तीसाठी शरीराचे निंबलोण करावे लागते. सगळ्या गुणांचे मिठ व संपत्तीचा गर्व त्याच्यावरून ओवाळून टाकावा लागतो.

परमेश्वराला तसे पाहिले तर काहीच नको असते. एखादा भक्त मनापासून त्याला फळ–फूल–पान, इतकेच काय, साधे पाणी जरी अर्पण करील, तरी त्याने परमेश्वरासाठी वैकुंठापेक्षा विशाल मंदिरे, कौस्तुभापेक्षा तेजस्वी रत्ने, क्षीरसागरासारखी दुधाची शय्यागृहे, गरुडासारखी वाहने, कल्पवृक्षांची उद्याने, कामधेनूची खिल्लारे अर्पण केल्यासारखेच होईल. भक्ताकडून मिळालेल्या थेंबभर पाण्यानेही तो संतुष्ट होतो. सुदाम्याने आणलेल्या मूठभर पोह्यासाठी त्याने त्याच्या परचुंडीच्या गाठी सोडल्याच ना ! तसेच पाहिले तर, फळ-फूल-पान ही केवळ भक्तीसाठी निमित्त होत. त्याला शुद्ध भक्तीचेच प्रेम असते. ‘ आम्ही भावाचे पाहुणे. ’

म्हणून सगळ्या क्रिया, ज्या जशा होतीत तशा त्या, भक्तीभावाने परमेश्वराच्या उद्देशाने कराव्यात. त्या क्रियांच्या कर्तृत्वाची आठवणही मनात येऊ देऊ नये. अशी सर्व कर्मे शुद्ध भावाने परमेश्वरार्पण केली की मग भक्ताला पुनर्जन्म नाही, आणि साहजिकच जन्माबरोबर येणारे त्रिविध तापही उरत नाहीत. अशा भक्तांना देह हा केवळ आयुष्यापुरताच उरतो. वाऱ्याच्या मागोमाग सुवास निघून गेल्यावर गंधहीने फूल जसे नुसतेच वेलीच्या देहावर राहते, तसे त्यांचे शरीराचे अस्तित्व असते.

आता, अशा प्रकारे अनन्यभावे भक्ती करणारा दुराचारी असला आणि त्याला पश्चाताप होऊन शेवटी जरी त्याने आपले सर्वस्व परमेश्वरार्पण केले, तरी त्याचे कुल पवित्र होऊन त्याच्या जन्माचे सार्थक होते. त्यासाठी कुळाच्या शुद्धपणाची आवश्यकता नाही, कुलीनपणाची प्रौढी मारायची गरज नाही किंवा शास्त्रज्ञानाचा हव्यासही बाळगायची जरुरी नाही. परमेश्वराचा भक्तीभाव जर भक्ताजवळ नसेल तर बाकी सारे व्यर्थ आहे.

शांत वातावरणात शांत ठिकाणी ठेवलेली ज्योत जशी अखंड तेवत रहाते, याप्रमाणे ज्याच्या मनामध्ये साई भक्तीची ज्योत तेवत राहील त्याच्यावर संकटरूपी वादळ केवढेही उसळले तरी त्याने ती ज्योत विझणार नाही. साईमाऊलीची सावली असणारा माणूस इतरांना दुःखी वाटत असेल, परंतु अंतर्यामी तो आनंदी, सुखी असतो. आपला बंधू अधिकार वाणीने सांगू इच्छितो की, साईस्तुती करा, बाबांची कवने करा. मानव स्तुती व्यर्थ आहे.

'देव भावाचा भुकेला । दास सेवकाचा झाला ।'

# जैसा जैसा भावे तैसा तैसा पावे

–श्री. महादेव दत्तात्रय भिडे
११९५, सदाशिव पेठ, पुणे ३०

● भगवान श्री गोपाल कृष्णानी गीतेच्या ४ थ्या अध्यायात 'ये यथा मां प्रपद्यंते–या श्लोकात सांगितले आहे की 'हे अर्जुना मनुष्यप्राणी कसाही वागला तरी शेवटी ज्या ज्या मार्गांनी माझ्या भक्तीसच अनुसरतात आणि मीहि ते (माझे भक्त) जशी भावना ठेवून मजकडे येतात तशा भावनेला अनुसरून तशाच प्रकारचे फल देतो.

भक्तांना आपल्या भावनेच्या संतोषाकरिता परमेश्वराचे विशिष्ट स्वरूपच हवेसे वाटते. भक्त आपले उपास्य दैवत, देव, देवता, संत, सद्गुरू आपल्या आवडीप्रमाणे एक निवडून तो पूजा अर्चा करतोही. प्रत्येक वेळी त्याना संकटे घालण्याचा प्रसंग त्याचेवर येतोच असे नाही. मानवी प्रयत्न जेव्हा निष्फळ होतांत तेव्हां तो हताश होतो. अंतःकरण पिळवटून त्याची करुणा भाकतो व मदतीची इच्छा करतो तेव्हा त्यांचे दैवत धावून येते, त्याला आपत्तीतून सोडविते, त्याचे रक्षण करते, पावते. त्याची जशी भावना तसे त्यास फळ मिळते.

संताना शरण आलेल्याची काळजी घ्यावी लागते. 'साधक भावे नमस्कार घाली। त्यांची चिंता साधूस लागली॥ यात लिहिल्याप्रमाणे ते संकटाचे वेळी धावून येतात. मात्र भाव हवा. 'देह जावो अथवा राहो। माझा पांडुरंगी भावो॥ अशी दीन

उत्कट भावना, प्रेम हवे. तसे तुकाराम महाराजांचे होते. त्यांना पांडुरंगाला दर्शन द्यावे लागले. भक्त उपास्य देवतेला साकडे घालतो. त्याने पावावे अशी इच्छा करतो. ताबडतोब काम व्हावे म्हणून बसतो. पण श्रद्धाबरोबर सबुरी हवी हे त्याच्या ध्यानात येत नाही. श्री सद्‌गुरू साईबाबांनी आलेल्या प्रत्येक भक्ताला श्रद्धा ठेवा व सबुरी धरा असेच सांगितले आहे. संताच्या कसोटीला भक्ताला उतरावे लागते.

भक्तात आर्त, जिज्ञासू, स्वार्थी असे तीन प्रकारचे भक्त आहेत. भक्त जी जी भावना करील, मागेल ते ते संत देव उपास्य दैवत त्याना पुरवितात, देतात, त्यांची इच्छा पूर्ण करतात. परिणामाची जबाबदारी भक्तावर तो ठेवतो. सत्कृत्य व दुष्कृत्य यांचे फळ त्याला भोगावे लागते.

भगवान श्रीशंकर अत्यंत भोळे. येणाऱ्या भक्ताना ते पावतात, व वर देऊन तथास्तू म्हणतात. देव व दानव या दोन्ही भक्ताना इच्छेप्रमाणे त्यानी वर दिले. दानवानी त्याचा उपयोग प्रजेला त्रस्त करण्याकडे केला व अंती नाश पावले. संतानी भक्तांची श्रद्धा मागणी सद्‌भावनेची पाहूनच त्याना संरक्षण दिले. इच्छा पूर्ण केल्या देव व संत यातील हा फरक आहे.

भक्त जेव्हा संताना उपास्य देवतेला अनन्य भावे लीन होऊन शरण जातो, तेव्हा त्याचे अंतकरण पिळवटून निघते. तो व्याकुळ झाला की त्यांचे देहातील इलेक्ट्रीक मोटार चालू होते. करंट सुरू होतो. तो करंट हवेतून त्यांच्या उपास्य देवतेकडे जातो, खेचला जातो. देव व भक्त संत एकच आहेत. भक्तांचा आत्मा दुखावला की संताना त्याचे दुःख होते. खेचला गेलेला बीज करंट संतांच्या हृदयात शिरून परावर्तित होऊन, हवेतून परत भक्ताकडे येतो. त्यांच्या त्यांच्या भावनेसह. फळासह, संताना सद्‌गुरूना दुःख होते भक्तांचे ते त्यांना सहन होत नाही. ते संरक्षण देतात. कामात यश देतात व नवसास पावतात.

विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की हवेत उत्पन्न झालेला करंट एका केंद्रातून दुसऱ्याकडे जातो. तेथे खेचला जातो आपण T. V. पाहतो. रेडिओ ऐकतो. तें एका केंद्रात तयार होऊन पाठविले जाते. ते दुसऱ्या केंद्रात खेचले जाऊन पडद्यावर उमटते तेव्हा चित्रे दिसतात व स्वर ऐकू येतात. संत कोठेही असोत भक्तांची हाक त्याना ऐकू येतेच.

पत्र पुष्प फल व तोय म्हणजे पाणी हे त्यांना अर्पण केले की ( देवावर टाकले की ) ती पूजा होते. पण त्यात प्रेम, भाव भक्ती नसेल तर पोचत नाही.

श्री संत तुकाराम महाराजांच्या पोथ्या इंद्रायणीत बुडाल्या होत्या. त्या तुकारामांच्या आर्त हाकेने, टाहो फोडल्याने पांडुरंगाने दर्शन दिले व हट्ट पुरविला. जशाच्या तशा न भिजता वर काढून द्याव्या लागल्या. श्री नामदेवाला त्यांच्या भावाप्रमाणे त्याने आणलेला नैवेद्य स्वतःच्या हाताने खावा लागला. दर्शन दिले. भाव काय करू शकतो याची ही उत्तम उदाहरणे आहेत.

संताच्या चरित्रात अशा तऱ्हेचे अनुभव सर्वत्र आहेत. शिर्डीचे साईबाबांनी आपल्या भक्ताना त्यांच्या त्यांच्या उपास्य देवतेचे (विठ्ठल, श्रीराम, शिव,) यांचे दर्शन करविले. नुसत्या दृष्टीक्षेपाने, उदी देऊन भक्तांची संकटे दूर केली. त्यांचे संकटातून वाचविले; जीवदान दिलेले आपण श्रीसाईलीला मासिकातून येणाऱ्या भक्तांचे लेखातून नित्य वाचतो. हुबळीच्या एका भक्ताची नात प्रेतवत् झाली असताना ती जीवंत केली. ती भक्ताने टाहो फोडलेला ऐकून ही हकीगत वाचली असेलच.

नवसाने मारलेल्या हाकेने चित्‌शक्ती जागृत होते ती कार्यवाही करू लागते. प्रार्थना ही देवतेतील ज्ञानशक्ती जागृत करण्याचे साधन आहे. संताना देवाना अंतःकरण पूर्वक भाव ठेवून हाका मारा. ते धावून येतात. ते तुमची इच्छा पूर्ण करतात. हे ईश्वरी शक्तीने दाखवून दिले आहे.

ज्या मनी जैसा भाव तया तैसा अनुभव याची प्रचिती बाबांनी वेळोवेळी दिली आहे.


## श्रीसाईलीला

**६१ व्या वर्षाचा पहिला अंक येत्या रामनवमीस प्रकाशित होणार.**

भारतातील थोरामोठ्या श्रीसाईभक्तांचे श्रीबाबांच्या विषयीचे अनुभव, विशेष लेख, आठवणी, ज्येष्ठांचे शुभसंदेश इत्यादी वाचनीय भरपूर मजकूर. या खास अंकासाठी कुणाही भक्ताने आपले साहित्य पाठवू नये.

# लेखक-कवी आठवे स्नेह संमेलन-शिरडी सन-१९८२

श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक-कवींचे स्नेहसंमेलन श्रीक्षेत्र शिरडी येथे रविवार दि. ३१-१-१९८२ व सोमवार दि. १ फेब्रुवारी १९८२ रोजी भरविण्यात येत आहे. या दोन दिवसाच्या स्नेहसंमेलनात श्रीबाबांचे जवळून दर्शन सुख, मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, परस्पर परिचय, श्रीसाईलीला विकास, प्रचार, प्रसार, इत्यादि दृष्टिने चर्चा व विचारविनिमय शक्य झाल्यास एखाद्या विषयावर परिसंवाद असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

श्रीसाईलीला मासिकाला साठावे वर्ष चालू असतांना हे संमेलन भरविण्यात येत आहे. या दृष्टिने या संमेलनाला एक विशेष महत्त्व आहे.

या संमेलन प्रसंगी फक्त श्रीसाईलीलेच्याच लेखक-कवी मंडळींना निमंत्रीत केले जाणार असल्याने गेल्या सात वर्षात कमीत-कमी निदान चार वेळा तरी आपले गद्य वा पद्य साहित्य श्रीसाईलीलेतून प्रसिद्ध झालेले आहे अशाच लेखक-कवी यांना निमंत्रींत केले जाईल. हे निमंत्रण बंधन पाळून व लक्षात घेऊन श्रीसाईलीलेच्या ज्या लेखक-कवींना स्नेहसंमेलनास हजर रहाण्याची इच्छा असेल त्यांनी याच अंकात इतरत्र वर दिलेला तक्ता बॉलपेननेच लिहून तो संपूर्णपणे भरून खाली दिलेल्या पत्त्यावर १६ जानेवारी १९८२ च्या आत शिरडी येथे मिळेल असा पाठवावा तो येताच त्यांना रितसर अधिकृत निमंत्रण कार्ड रवाना केले जाईल. १६ जानेवारी १९८२ नंतर या संमेलनाचे बाबतीत कोणताहि पत्रव्यवहार केला जाणार नाही. संमेलनास येणाऱ्यांनी ३०-१-१९८२ पूर्वी येऊ नये.

या संमेलनास हजर रहाणाऱ्याची निवास, चहापान व भोजन-प्रसादाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थान तर्फे केली जाईल.

तक्ता पाठविण्याचा पूर्ण पत्ता :—

श्री. कोर्ट रिसीव्हर, साहेब<br>
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी मु. पो. शिरडी,<br>
ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. पिन-४२३१०९.

कार्यवाह<br>
**डॉ. श्री. दि. परचुरे,**<br>
**श्री. सदानंद चेंदवणकर,**

निमंत्रक,<br>
**क. हि. काकरे**<br>
कोर्ट रिसीव्हर,<br>
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी.

## : लेखक-कवी ८ वे स्नेहसंमेलन, शिरडी येथे रविवार-सोमवार :
## दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी १९८२ रोजीचे

माननीय श्री. कोर्ट रिसीव्हरसाहेब,
यांना सा. न. वि. वि.

शिरडी येथे भरणाऱ्या ८ व्या लेखक-कवी स्नेहसंमेलनास मी हजर राहू इच्छितो-इच्छिते, आपणास हवी असलेली माहिती खाली लिहीत आहे.

१) संपूर्ण नाव (प्रथम आडनाव)

२) संपूर्ण पत्ता :-

३) व्यवसाय :-

४) शिक्षण :- ५) वय :-

६) श्रीसाईलीलेचे वर्गणीदार आहे-नाही :-

७) वर्गणीदार असल्यास मराठी-अगर इंग्रजी व वर्गणीदार क्रमांक :-

८) श्रीसाईलीलामधून गद्य की-पद्य लिहिता :-

९) लेख-किंवा काव्याची शिर्षके (केवळ संदर्भासाठी) प्रसिद्धी :-

१) महिना :- वर्ष :-

२)

३)

४)

५)

१०) सोबत कुणी येणार आहे? होय-नाही.

११) कोण येणार? (नातू, पती-पत्नी-मुलगा-मुलगी-भाऊ-बहीण यापैकी कुणाही एकासच आणता येईल.)

१२) संमेलनात काही ठराव मांडणार? होय-नाही :-

१३) ठराव वेगवेगळ्या कागदावर लिहून पाठवा व त्यासंबधी आपले विचारही टाचण करून पाठवा, )

तारीख. १-१९८२

स्वाक्षरी :-

# असाही एक अनुभव

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆ ☆☆ ☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

–श्री. **दिलीप माणिकसिंग परदेशी**
परदेशीपुरा, राममंदिराजवळ
नंदुरबार, जि. धुळे

● आमचे मामा स्वभावाने फार भोळे. घरातील सर्व व्यवहार काय तो लहान मामा व मोठ्या मामींनी पहावयाचा. मामाच्या दोन मुली लग्नाच्या वयात आल्या होत्या. अर्थात मुली म्हटल्या म्हणजे सर्वात महत्वाचा प्रश्न भेडसावतो तो नवरा मुलगा मिळण्याचा. त्यातल्या त्यात घर बरं मिळेल का ? नोकरी असेल का ? घरातील वर्तणूक ममतेची असेल का ? व ह्या सर्व गोष्टी अवगत मिळाल्या म्हणजे शेवटचा प्रश्न उभा राहतो. वराकडील मंडळी अपेक्षापेक्षा जास्त काही मागेल का ? तर सांगावयाचे एवढेच की, जानेवारीच्या प्रथम आठवड्यात मध्य प्रदेशातील एक स्थळ मुलींना पहावयास आले. मामाची आर्थिक परिस्थिती साधारणच आहे. करता वराकडील मंडळी संबंध करतीलच याची खात्री नव्हती. वधूपरिक्षेत त्यांची दोन नंबरची लहान मुलगी पसंत झाली पण ह्या शर्तीवर की, लग्न व्यवस्थित पण जानेवारीच्या तिथीतच करून द्यावे. पण मामांना मोठी मुलगी ठेवून दुसऱ्या मुलीचे लग्न कसे करावे म्हणून अडचण भासत होती. कारण समाजाच्या दृष्टीने मोठी मुलगी लग्नाची राहून लहान मुलीचे लग्न करणे म्हणजे पर्यायाने पुढे तिला स्थळे येतीलच याची शंका येवू लागली. मी व लहानमामा देखील याबाबतीत विचार करू लागलो. कारण आलेले स्थळ नाकारणे उचित नव्हते. मी विचार करीत समोर कॅलेन्डरवरील श्रीसाईबाबा यांच्या फोटोकडे प्रश्नचिन्ह नजरेने पहात होतो. कदाचित माझ्या मनातील गोंधळ बाबांनी ओळखला असावा व त्याच क्षणी माझ्या लहान मामांच्या तोंडून असे शब्द निघाले की दुसरी मुलीचे लग्न जमवून टाकू. साईबाबांची इच्छा व कृपा आपल्या पाठीशी आहे. तिचेही जमून जाईल. थोडा अधिक विचारविनिमय होवून एकदाचं लग्न ३१ जानेवारी रोजी निश्चित ठरले.

पण बाबांनी आमची अडचण अगदी नकळत व स्वप्नात देखील विचार केला नसावा ह्या पद्धतीने सोडवून आमच्या मामांच्या कुटुंबियांना भक्तीची ओढ लावली. कारण दुसऱ्या मुलीचे स्थळ पाहणी डिसेंबरमध्ये झाली काय अन् लग्न जानेवारीत ठरतेय काय...सर्व काही लग्न तयारीत गुंतले असताना अचानक जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात एक स्थळ आले आणि त्यांनी मुलीस पाहिले. मुलगी एका डोळ्याने अंध

असताना देखील त्यांनी तिला पसंत केली पण वर मंडळी काही सांगावयास विचकत होती म्हणून पुढाकार घेऊन विचारणा केली तर त्यांनी सांगितले की, लग्न जानेवारीत करीत असाल तर आम्ही होकार देतो. आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन डोळे. मामांना तर स्वर्ग दोनच बोटे उरले होते. त्यांनी त्याचक्षणी होकार दिला. लहानमामा म्हणाला, "मी सांगितले होते ना बाबांवर विश्वास ठेवा. बाबा भले करतील. बाबांनीच हा सुवर्णयोग आणून मुलीच्या बाबतीत घडोघडी वाटणारी काळजी दूर केली. बाबांनी शद्ब खरा करून दिला.

दोघा मुलीचे लग्न साईकृपेने ता. ३१ जानेवारी ८१ रोजी चांगल्या रितीने पार पडले. दोघीही आपल्या घरी सुखी आहेत. मामांचा मुलगा शिर्डी येथे जावून बाबांचे दर्शन घेवून आला. तेथून एक सुबक फोटो आणला असून देव्हाऱ्यात त्याची नित्यनियमाने पूजा होते. बाबांनी असाध्य गोष्ट थोड्याच काळात साध्य करून सर्वांना भक्तीची ओढ लावली. त्यांच्या धार्मीक विस्ताराच महत्व खालील वचनात आहे.

नित्य मी जीवंत, जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥

☆

# बाबांची कृपा

—श्री. शितोळे जे. एस.
सिक्युरीटी ऑफीसर ग्लाईट लेगर (इं.) लि.
मु. पो. औरंगाबाद,

● मी दिनांक २६-१०-८१ रोजी हैद्राबाद शिर्डी गाडीने, शिर्डीस येण्यास निघालो. ठीक ७ वाजता, गाडी कोपरगाव येथे आली, चहा पिण्यासाठी, खाली उतरलो तो तेथेच खाली राहीलो सामानाची बॅग मात्र शिर्डीस आली. नाइलाजाने तेथेच थांबून राहिलो. तेथून शिर्डीस फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु फोनही मिळाला नाही. परंतु बाबांच्या कृपा आशीर्वादाने बॅग मात्र, सुखरूपपणे एस. टी. कंट्रोलरचे केबीनमध्ये उतरली गेली, व नंतर मागचे गाडीने ९-३० वाजता शिर्डीस आलो व बॅग ताब्यात घेतली, बॅगेत एक हजार रुपये किंमतीचे सामान होते व बाबांचा फोटोही होता.

केवळ बाबांच्या कृपा आशीर्वादाने, बॅग परत मिळाली.

# निर्वाणीची हाक मारा बाबा धावून येतात

—सौ. पद्मावती वैद्य
७ बी जीवन आशा, पेडर रोड मुंबई २६

● सन १९८१ ता. १६ सप्टेंबरचा हा अनुभव आहे. श्री. पू. बाबांना भेटायची ओढ नेहमीच असते. भेटीचा हा आनंद पण काही वेगळाच आहे. आम्ही ता. १६ सप्टेंबरला शिर्डीला जायचे ठरवले. बाबांनी बोलावलच म्हणून निघालो संकल्प तर होताच. माझ्या मुलाला मुलगा झाला होता. ते बाबांना सांगायचे व पूजा करायची होती. वंशवृद्धी झाली म्हणून आणि माझ्या मुलीची ४ वर्षाची मुलगी तिचा पाय मोडला होता. त्यावेळी बाबांना प्रार्थना केली होती. की हिचा पाय पूर्ण बरा होऊ दे. ती नाचत नाचत शिर्डीला येवू दे. पहिल्या सारखा पाय होवू दे. त्याप्रमाणे पाय संपूर्ण बरा झाला. कसली पण खोड राहिली नाही. म्हणून माझी मुलगी जावई, दोघी नाती अशी पुण्याहून टॅक्सीने दुपारी २ वाजता १६ सप्टेंबरला निघालो. पावसाळा संपलाच होता. त्या दिवशीतर चक्क कडक उन होते. पावसाची खूण पण काही नव्हती. आम्ही निघालो ५ वाजता नगर सोडले मात्र आणि अचानक जो पाऊस लागला. तो भयंकरच होता. धबाधब ओतत होता. काळे कुट्ट ढग होते. आम्ही सर्व जणच काळजीत पडलो. पाऊस थांबायचे तर लक्षण नव्हतेच. वाटले जर गाडीला मध्येच काही होवून बंद पडली तर काय करायचे ? वाटेत काही सोय नाही. मुले लहान, संध्याकाळ झाली, आता काय करावे ? मग बाबांचा धावा सुरू केला. बाबा, साई-माऊली तूच आता रक्षण कर. गुरुवार, तुझा वार आहे. आज दर्शन घडव व शिर्डीत ने आता तुमच्याशिवाय कुणी तारणार नाही. मनोमन प्रार्थना केली आणि काय चमत्कार राहुरीनंतर २५ मैलावर आणि शिर्डीच्या दिशेला संबंध पट्टाच्या पट्टा. पाऊस उजाडला. पुण्याच्या बाजूला खूप पाऊस भरला पण शिर्डीकडे उघडतच गेला. आणि शिर्डीत पोचलो तर रस्ते कोरडे होते. एकदाचे शिर्डीत पोचलो बाबांचीच कृपा त्यांना काय अशक्य आहे ? गाडी शिरडीत पोचली आणि आम्ही सर्व जण, त्या लहान मुली पण खूप आनंदल्या दिसली बाबांची शिर्डी ह्याचा खूप खूप आनंद झाला. प्रथम हातपाय धुवून आधी मंदिरात गेलो. समाधी दर्शन झाले. गुरुवार होता दुसरे दिवशी मग दुसरे दिवशी अभिषेक पूजा आरती सर्व करून बाबांचे पायावर डोकं ठेवायला मिळाले ह्याच आनंदात घरी परतलो परत येताना काही त्रास झाला नाही. बाबांच्या कृपेने सुखरुप परत आलो पाऊस सुद्धा थांबू शकतो ही बाबांची महती त्यावेळी पुरेपुर पटली धन्य ते साई धन्य ती माऊली निर्वाणीची हाक मारा बाबा धावून येतात हे अक्षरशः खरं आहे. 卐

# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तांसाठी सूचना

१) शिरडीस पोहोचल्यानंतर चौकशी कचेरीत खोलीबद्दल चौकशी करा व आपले नाव प्रथम तिथे नोंदवा.

२) खोलीत सामान ठेवून कुलूप लावल्यांशिवाय कोठेही बाहेर जाऊ नका.

३) सार्वजनिक हॉलमध्ये जागा मिळाली तर तुमचे सामान चिजवस्तू सांभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मागावर असतात.

४) स्नानगृहातून बाहेर येताना पैशाचे पाकीट, दागिने, हातातील घड्याळ, कपडे, भांडी वगैरे बरोबर घेण्यास विसरू नका.

५) अंगावर दागिने असलेल्या आपल्या लहान मुलांना एकटे सोडू नका.

६) श्रींचे आरतीचेवेळी धक्काबुक्की होते. त्यावेळी आपल्या मुलांना संभाळा व व आपल्या खिसा पाकिटांवर लक्ष ठेवा.

७) श्रींचे ऑफीस शिवाय कोणत्याही इतर ठिकाणी अगर कोणाच्या हातात पैसे देऊ नका. धर्म कृत्य फक्त संस्थेमार्फत करावे.

८) श्रींचे ऑफिसात धर्म कृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागून घ्या.

९) श्री साईबाबा संस्थानचा, इतर ठिकाणी श्री साईबाबांचे नावावर चाललेल्या संस्थांशी काहीही संबंध नाही.

१०) श्रींचा कोणी शिष्य नाही. अगर वारसदार गादीवर बसलेला नाही. अगर मध्यस्ती नाही. कोणी श्रींच्या पेहेरावासारखा पेहेराव केला म्हणून विश्वास ठेवून फसू नका.

११) मार्गदर्शकांचे सोंग करून काही अपरिचित माणसे, शिरडीची स्थळे दाखविण्यासाठी ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेऊ नका.

१२) श्रींचे नावावर काही माणसे जंतर मंतर, धागादोरा करणारे मांत्रीक तांत्रींक म्हणून फिरत असतात, त्यांचेपासून सावध रहा.

१३) श्रींचे नावावर चालू असलेल्या साखळी पत्रास अजिबात महत्व देऊ नका.

१४) श्रींचे बाबतीत आधारभूत माहिती, ऑफिसात विचारावी. इतरांवर विश्वास ठेऊ नका.

१५) आपली काही तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठी ठेवलेल्या नोंद पुस्तकात नोंदवा. आपले पूर्ण नाव व पत्ता नोंदविण्यास विसरू नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.

# बंगलोर येथे भरविण्यात आलेले अखिल भारतीय साईभक्तांचे १९ वे अधिवेशन

यंदा बंगलोर येथे श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरच्या विद्यमाने अखिल भारतीय श्रीसाईभक्तांचे १९ वे अधिवेशन शुक्रवार दिनांक ४ व शनिवार दिनांक ५ डिसेंबर रोजी भरविण्यात आले होते. श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटर त्यागराज नगर या केन्द्रापासून सुमारे तीन चार मिनिटाच्या अंतरावर असलेल्या गिरीजा कल्याण मंदिर या भव्य सभागृहात हे अधिवेशन भरविण्यात आले होते. ठिकठिकाणाहून आलेल्या स्त्री पुरुष प्रतिनिधींची रहाण्या-उतरण्याची निवास भोजन चहापाण्याची सर्व ती व्यवस्था पण येथेच करण्यात आली होती. सबंध भारतातून सुमारे ३०० वर स्त्री पुरुष प्रतिनिधी अधिवेशनास आलेले होते. या अधिवेशनाला जोडूनच अखिल भारतीय साई समाजाचे दिवंगत अध्यक्ष प. पू. श्री राधाकृष्णस्वामी उर्फ श्रीसाईपादानंद यांच्या बसलेल्या पण पूर्णाकृती अशा संगमरवरी पुतळयाचा अनावरण समारंभही ठेवण्यात आलेला होता त्यामुळे हे अधिवेशन तीन दिवस साजरे करण्यात आले असे म्हणावयास हवे.

अधिवेशनास व स्वामींच्या पुतळा अनावरण समारंभास मुंबईहून श्रीसाईलीला मासिकाच्या मराठी आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर व सौ. चेंदवणकर, इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे व सौ. परचुरे, श्रीसाईबाबांना पाहिलेले वांद्रयाचे भक्त डॉ. गजाननराव दाभोलकर, खास आमंत्रणावरून उपस्थित होते. स्वामीजींचे परम भक्त व सेंटरचे एक मुख्य आधारस्तंभ श्री. व सौ. जी. आर. इनामदार व बोरीवलीचे साईभक्त श्री. एन. जी. परुळेकर, श्री. माधव गोरे ही मंडळी पण मुंबईहूनच गेली होती. पुण्याहून शिवाजीनगर येथील श्री. साईदास मंडळातर्फे श्री. सूर्यकांत गर्जे, श्री. आर. बी. मोरे व अन्य मंडळी होती.

या अधिवेशनास प. पू. राधाकृष्णस्वामीजींचे ८५ वर्षांचे वडील बंधू प. पूज्य श्री रामगोपाल अय्यर, मद्रासचे वयोवृद्ध साईभक्त ९० वर्षे वयाचे स्वामी श्री शुद्धानंद भारती, परदेशात श्रीसाईभक्तीचा प्रचार-प्रसार करणारे सिमल्याचे भक्त डॉक्टर बाबाजी, नागसाईबाबा ध्यान-मंदिर मोटूर (आंध्र प्रदेश) चे श्री मोटुरुबाबा, बंग-

लोरच्या श्रीशिवाम्मा सौ. अय्यप्पा, डॉ. सौ. केळकर, सौ. शीला रामचंद्र राव इत्यादी विशेष प्रसिद्ध भक्तमंडळी आली होती.

शुक्रवार दि. ४–१२–८१ रोजी सायंकाळी ४–३० वा. श्री साईबाबांच्या भव्य तसबिरीची वाजत गाजत मिरवणूक श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटर पासून निघून ती अधिवेशन स्थळी आणण्यात आली. या मिरवणुकीबरोबर अधिवेशनास आलेली साई-भक्त प्रतिनिधी मंडळी बहुसंख्येने होती. अधिवेशनाचे उद्‌घाटन इनकमटॅक्स कमिशनर व श्री रमण महर्षि सेंटरचे एक चिंतक श्री. ए. आर. नटराजन यांनी केले. अध्यक्षस्थानी 'डेक्कन हेराल्ड' या दैनिकाचे वृत्त संपादक श्री. आर. शेषाद्री हे होते. या समारंभात १९ व्या अधिवेशन प्रसंगीचे निमित्याने प्रकाशित करण्यात आलेल्या २०६ पानांच्या सुंदर स्मरणिकेचे प्रकाशन डॉ. ए. आर. पै यांचे शुभहस्ते करण्यात आले. स्मरणिकेची पहिली प्रत श्रीस्वामी शुद्धानंद भारती यांना, दुसरी डॉ. दाभोलकर यांना व तिसरी श्री. राजगोपाळ अय्यर, करुर यांना भेटी दाखल देण्यात आली.

नंतर 'गुरुभक्ती' या विषयावर प्रो. एस. के. रामचंद्रराव, प्रो. एच. एस. वरदा देसीकावर, श्री. विश्वनाथन, श्री. डी. पी. सेन कलकत्ता, श्री. आय. पी. मेहता चंदीगड, श्री. टी. केशवराव अध्यक्ष ऑल इंडिया साई समाज मद्रास, श्री. सी. व्ही. भास्करराव अध्यक्ष श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटर बंगलोर यांची गुरुसेवा व गुरुभक्ती याच विषयावर भाषणे झाली. शेवटी प्रो. आर. एन. अयंगार यांनी आभार मानले. सायंकाळी ७–४५ वा. 'शिरडी दर्शन' हा प्रेक्षणीय चित्रपट सभागृहात दाखविण्यात आला व त्यानंतर अधिवेशनाचे पहिले सत्र संपले.

शनिवार ता. ५-१२-८१ रोजी सकाळी ९ वा. अधिवेशनाचे कार्यक्रमास सुरुवात झाली. श्री. टी. केशवराव यांचे अध्यक्षतेखाली 'उपसमाजाचे विविध कार्यक्रम' व श्री. जी. आर. इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली ठिकठिकाणच्या साई संस्थानांचे विविध उपक्रम व हालचाली या विषयावर ठिकठिकाणच्या साईभक्त कार्यकर्त्यांची भाषणे झाली. श्री. डी. राममूर्ती साईभक्त मंडळ, नेलोर, श्री. डी. पी. सेन कलकत्तार श्री. सूर्यकांत गर्जे पुणे, श्री नरसिंहबाबा करूर (त्रिची) श्री नागसाईबाबा (उदीवाडा), शिरडी साईसमाज काकीनाडा, श्री. मेहता चंदीगड, प्रो. नादन मद्रास, श्री. देशमुख विदर्भ सभा साईमंडळ, श्री. के. विश्वनाथन इ. नी या विषयांवर भाषणे केली. यानंत, डॉ. श्री. दि. परचुरे यांच्या अध्यक्षतेखाली 'भावी काळातील साई प्रचार' या विषयावर डॉ. बाबाजी, श्री. परुळेकर, श्री. सदानंद चेंदवणकर का. संपादक श्रीसाईलीला मराठी आवृत्ती, श्री. एन. रंगाचारी सिकंदराबाद इ. ची भाषणे झाली.

दुपारच्या सत्र अधिवेशनात विविध भक्तांना आलेले श्रीसाईबाबांचे अनुभव व्यासपिठावर येऊन कथन केले, त्यातील काही अनुभव तर खरोखरच मती गुंग करून सोडणारे होते. या अधिवेशनास श्री. आर. पार्थसारथी हे अध्यक्ष होते. स्थानिक भक्तांनी सांगितलेले एका अधिवेशन प्रसंगी श्री. आर. शेषाद्री हे अध्यक्ष होते. या भाषणाच्या कार्यक्रमानंतर श्रीमती सुलोचना नटराजन यांचा 'रमणांजली' गीत गायनाचा बहारदार श्रवणीय कार्यक्रम झाला. त्यांच्या दोन्ही कन्यका कु. अंबिका व कु. शारदा यांनी मराठी, हिंदी, तामिळ, तेलगु व कानडी अशा विविध भाषांतून रमण-महर्षिंची गीते सुमधूर आवाजात व बहारदार साथीत सादर करून उपस्थित साईभक्त रसिक प्रेक्षकांना अक्षरशः तासभर मंत्रमुग्ध केले.

रविवार ता. ६ रोजी सकाळी स्पिरीच्युअल सेंटरमध्ये श्रीस्वामीजींच्या पुतळ्याचा प्रतिष्ठापना व अनावरण समारंभ होता त्यामुळे सर्व भक्तांनी सेंटरला अक्षरशः गर्दी करून सोडली होती. श्री स्वामीजींच्या हंसनिकेतन या निवासस्थानी स्वामीजींच्या पादुकांचे व विविध वस्तूंचे दर्शन घेण्यासाठी भक्त बहुसंख्येने एकत्रित झाले होते.

याच दिवशी सायंकाळी ६-१५ वा. भारताचे माजी उपराष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती यांचे हस्ते श्रीराधाकृष्णस्वामींजीच्यावर इंग्रजी भाषेत लिहिल्या गेलेल्या चरित्र ग्रंथांचा प्रकाशन समारंभ पार पाडण्यात आला. हा सुंदर सचित्र २३२ पानांचा चरित्र ग्रंथ श्री. रंगास्वामी पार्थसारथी मद्रास यांनी लिहिला असून त्याला रामकृष्ण आश्रम बंगलोरचे अध्यक्ष स्वामी श्री अदिदवंद यांची प्रस्तावना आहे. "ॲपॉस्टल ऑफ लव्ह श्रीसाई पादानंद" असे या ग्रंथाचे नाव असून तो ऑल इंडिया साई स्पिरीच्युअल सेन्टरने प्रकाशित केला आहे. त्याची किंमत ३० रु. आहे. श्री. जत्ती यांनी या प्रकाशन समारंभ प्रसंगी केलेल्या सुंदर, आध्यात्मिक भाषणात गुरू व सद्गुरू यावर छानदार विवेचन केले. या समारंभप्रसंगी कर्नाटक राज्याचे भूतपूर्व शिक्षणमंत्री श्री. ए. आर. बद्रीनारायण अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते. तर श्री. के. के. मूर्ती बंगलोर विकास विभागाचे अध्यक्ष हे मुख्य पाहुणे म्हणून हजर होते. ग्रंथलेखक श्री. पार्थसारथी यांचेही या प्रसंगी भाषण झाले व त्यांचा अध्यक्षमहोदयाचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. बाबांचे परमभक्त व सेन्टरचे एक मुख्य आधारस्तंभ श्री. टी. श्रीचंद राजपाल यांचेही स्वामींच्या संबंधीच्या विविध अनुभवांचे अगदी मनमोकळेपणाने भाषण झाले. रात्री ९ वाजता हा छानदार सोहळा संपला.

शेवटी श्री. टी. केशवराव व श्री. सी. व्ही. भास्करराव यांची ठिकठिकाणच्या सर्व प्रतिनिधीना व साईभक्तांना उद्देशून निरोपादाखल भाषणे झाली व श्री. के. विश्व-

नाथन, सेन्टरचे चिटणीस यांनी सर्वांचे आभार मानले. समाजाचे पुढील २० वे अधिवेशन मद्रास येथे पुढील वर्षी भरणार आहे.

या अधिवेशन प्रसंगी भारतातील ठिकठिकाणाहून आलेल्या सर्व प्रतिनिधींची निवास, नास्ता, चहाकॉफी, भोजन इ. ची उत्कृष्ट व्यवस्था श्रीसाई स्पिरीच्युअल सेन्टरने केली होती त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच !

–साईनंद

### प. पू. राधाकृष्ण स्वामीजींच्या पुतळ्याचा

## प्रतिष्ठापना समारंभ

अखिल भारतीय श्रीसाईसमाजाचे अध्यक्ष, बंगळोर येथील श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटर या संस्थेचे संस्थापक व दक्षिणेत प. पू. नरसिंह स्वामींची गादी पुढे चालवून साई निवीतत्वांचा प्रचार–प्रसार करणारे वंदनीय महापुरुष प. पू. श्रीराधाकृष्ण स्वामी उर्फ श्रीसाईपादानंद यांचे १४–१–१९८० रोजी महानिर्वाण झाले. त्यांची स्मृती सतत कायम रहावी म्हणून त्यांच्या स्पिरीच्युअल सेंटरमध्ये त्यांच्या पूर्णाकृती मांडी बैठक घातलेल्या पुतळ्याची शास्त्रोक्त विधीपूर्वक प्रतिष्ठापना त्यांच्या हजारो भक्तमंडळींच्या उपस्थितीत रविवार दिनांक ६ डिसेंबर १९८१ रोजी सकाळी करण्यात आली. प्रत्यक्ष पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी तीन दिवस अगोदरपासून विविध प्रकारचे यज्ञ व होमहवन करण्यात आले. वास्तु होम, महागणपती होम, कलश पूजा मूर्ती होम, शुद्धी होम, कळा होम, सुब्रह्मण्यम होम, दुर्गा होम, पुरुषसूक्त होम, सूक्त होम, प्रतिष्ठापना होम, शिवशक्ती होम, रामकृष्ण अंजनेय होम, साईनाथ होम अशा प्रकारचे मंत्रोपचाराचे विधीयुक्त होम होऊन पूजा करण्यात आली. नंतर महाभिषेक होऊन दिपाराधना विष्णूसहस्त्र नामावलीच्या मंगळ सूरात श्रीस्वामींच्या संगमरवरी पुतळ्याची विधीयुक्त स्थापना करण्यात आली. आशिर्वाद, मंगल आरती व पूर्णाहूती होऊन हा पुतळा प्रतिष्ठापना विधीचा कार्यक्रम मंत्र जयघोषात व भक्तांच्या नादनिनादात पार पडला. सेन्टरचे सर्व कार्यकर्ते या प्रसंगी जातीने हजर होते.

श्री स्वामीजींचा हा पुतळा संगमरवरी पांढरा शुभ्र असून तो जयपूर येथून तयार करून आणण्यात आला आहे. कमळाप्रसाद सत्यनारायण पांडे या शिल्पीने तो

तयार केला आहे. स्पिरीच्युअल सेन्टरमधील श्रीसाईबाबांच्या मूर्तीच्या उजव्या हातास एका चौथऱ्यावर तो प्रतिष्ठापीत करण्यात आला आहे. हा चौथरा ६ फूट लांब, ६ फूट रुंद व दिड फूट उंच या मोजमापाचा आहे. पुतळा प्रतिष्ठापना विधीप्रसंगी श्रीसाई-लीला मासिकाचे दोन्ही कार्यकारी संपादक डॉ. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर हजर होते व त्यांनीही स्वामीजींना श्रद्धांजली अर्पण केली.

☆

**ग्रंथपरिक्षण–**

# ॲपॉस्टल ऑफ लव्ह

## श्रीसाईपादानंद

[ ॲपॉस्टल ऑफ लव्ह–श्री साईपादानंद, लेखक–श्री. रंगास्वामी पार्थसारथी, प्रकाशक–ऑल इंडिया साई स्पिरीच्युअल सेंटर, साईबाबा मंदिर रोड, त्यागराजनगर, बंगलोर, पाने ३३३, किंमत ३० रुपये ]

प्रेमाचे प्रेषित स्वर्गीय श्रीराधाकृष्णस्वामी उर्फ श्रीसाईपादानंद यांचे हे इंग्रजी भाषेत लिहिलेले सुंदर चरित्र आहे. ३३३ पानांच्या या चरित्रग्रंथात स्वामीजींचे पूर्वायुष्य, दक्षिणेत साईभक्तीचा, तत्त्वप्रणालीचा प्रचार प्रसार करणारे प. पू. नरसिंह स्वामीजींशी गाठ पडल्यावर स्वामीजींच्या दिनचर्येत व कार्यात झालेला फरक, [मद्रास व बंगलोर येथील श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटरची स्थापना, गुरू आणि शिष्य, खरा भक्त कोण, योग्य विचारसरणी आणि वागणूक वर्तणूक, गुरुभक्ती, सत्संग, शुद्ध भक्तीभावपूर्ण प्रेमाचे तत्त्वज्ञान, जीवन हे संगीत आहे, धर्म विरुद्ध शास्त्र इ. स्वामी-जींच्या जीवनाशी निगडीत अशी एकूण १८ प्रकरणे यात आहेत. शेवटच्या दोन प्रकरणातून तर स्वामीजींचे काही चमत्कार वर्णन केलेले आहेत. तर आणखीन एका प्रकरणात भक्तमंडळींना स्वामीजींचे आलेले काही अनुभव विषद करून सांगितलेले आहेत. स्वामीजी अंतर्ज्ञानी होते यासंबंधीच्या अनेक गोष्टी आहेत व त्याचा अनुभव त्यांच्या अनेक भक्तमंडळींना आलेला आहे. स्वामीजींच्या या पुस्तकाला बंगलोरच्या रामकृष्ण आश्रमाचे अध्यक्ष स्वामी श्री अदिदवंद यांनी सुंदर प्रस्तावना लिहिली असून स्वामीजींच्या संबंधीची काही दुर्मिळ छायाचित्रे पण आहेत. ग्रंथाची सजावट व छपाई सुबक करण्यात आली असून मुखपृष्ठावर श्रीस्वामीजींचे मोहक चित्र आहे. स्वामीजींच्या प्रत्येक भक्ताने आपल्या संग्रही हा ग्रंथ ठेवावा अशी आमची शिफारस असून प्रत्येक भाषेत तो अनुवादिला जावा व तसा यत्न स्वामीजींच्या भक्तांनी करावा

अशी आमची अगत्याची सूचना आहे. भारताचे भूतपूर्व उपराष्ट्रपती व थोर अध्यात्मवादी श्री. बी. डी. जत्ती यांचे शुभ हस्ते हा सर्वांगसुंदर ग्रंथ १९ व्या बंगलोर येथे भरलेल्या ऑल इंडिया साईभक्त अधिवेशन प्रसंगी प्रकाशित करण्यात आला.

— साईनंद

## श्री साईस्मरण

[ कवि–श्री. मधुकर ठाकूर, ४० कॅनरा हाऊस, मोगल लेन, माहिम, मुं. १६ पाने ३२, किंमत ५० पैसे ]

अध्यात्मवादी शिघ्र कवी श्री. मधुकरराव ठाकूर यांनी शिरडीच्या लेंडी बागेत एक रात्र बसून हे अभंगरुप स्तोत्र १५१ ओवीत लिहिले आहे. नाथपंथीय श्रीसाईबाबांच्या बरोबर सध्याचे नाथपंथी योगी महाराज श्री गगनगडकर महाराज यांचीही स्तुती या अभंगातून त्यांनी केली आहे. यामुळे या दोन्ही संतावर त्यांनी आपली भक्तीभावपूर्ण सुमनांजली वाहिलेली आहे ती वाचताना कुणाही भाविकाचे मन भरून येते.

— साईनंद

## श्री. चिदानंद स्वामींची सायकलवरून प्रवासयात्रा

काही काळ शिरडी व काही काळ पुणे येथे रहाणारे श्री. चिदानंद स्वामी यांनी सायकलवरून हिमालयापर्यंतचा प्रवास केला आहे. ते पुण्याहून ८–११–८० रोजी प्रवासास निघाले व पाचगणी, महाबळेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट अशी पदयात्रा करीत २२–१२–८० रोजी शिरडीस आले. शिरडीहून ३–१–८१ रोजी ते सायकलवरून निघाले व मुंबई मार्गे, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बद्रीनाथ, केदारनाथ, पंजाब, जम्मू, काश्मीर, हिमालय असा प्रवास यशस्वी करून २०–१०–८१ ला पुन्हा शिरडीत मध्यप्रदेश मार्गे आले. गंगोत्री, झेलम, नर्मदा, कृष्णा, शरयू, गोदावरी इ. नद्यांचे जल त्यांनी येताना बरोबर आणले होते ते शिरडीस त्यांनी श्रीबाबांच्या समाधीला वाहिले.

# ॥ श्रीसद्गुरु साईनाथाय नमः ॥ 21

—सौ. मंदाकिनी शशिकांत केने
अ. ११, संतोष को. ऑप. हाऊसिंग सोसा.
ठाणे ४००६०१

● मी स्वतः मूळची विशेष आस्तिक नाही. परंतु श्रीसाईबाबांमुळे माझी परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा बसली.

साधारणपणे तीन वर्षांपूर्वी आमच्या शेजारी जे कुटुंब राहात असे, त्यांच्याकडे साईचरित्राचे पारायण वगैरे नेहमी चालत असे. त्यावेळी माझी मुलगी पोथी वाचून संपेपर्यंत त्यांच्याजवळ बसून राहत असे. त्यावेळी ती दिड–दोन वर्षांची होती. त्यांच्याकडचा श्री बाबांचा फोटो पाहून ती आमच्याकडे हट्ट करू लागली की आपल्याकडे पण तसा फोटो आणा. त्याप्रमाणे आम्ही फोटो आणला. ती फोटोकडे पाहून खूपच गप्पा मारीत असे. त्यामुळे मी जरी फारशी आस्तिक नव्हते, तरी मला फार आश्चर्य वाटे.

त्यानंतर काही दिवसांनी आम्ही मालकी हक्काच्या गाळ्यासाठी पैसे भरले. आणि आयत्या वेळेला माझी कर्जाऊ रक्कमेची मंजुरी होताना फार अडचणी येऊ लागल्या. आम्ही तर फार मोठ्या काळजीत पडलो. एकदम चाळीस हजार रुपये आणणार तरी कोठून ? आणि न आणावेत तर आम्ही भरलेले दहा बारा हजार रुपये पण बुडण्याची वेळ आली. आणि का कोण जाणे, एकदम असे वाटले की, आता श्रीसाईबाबांशिवाय या संकटातून आपल्याला तारणारे कोणी नाही. अशा तऱ्हेने १८ डिसेंबर १९७८ रोजी मी श्रीसाईसच्चरित वाचावयास सुरुवात केली. आणि श्रीसाईबाबांच्या कृपेने आश्चर्य वाटावे अशी गोष्ट घडली. नियमानुसार मी कर्जाऊ रक्कम मिळण्यासाठी पात्रता नसतानाही, कर्ज मंजुर झाले. आणि १६ मे १९७९ रोजी आम्ही नवीन घरात राहायला आलो सुद्धा !

हा अनुभव मुद्दाम लिहून पाठविण्याचे कारण म्हणजे माझी दुसरी मुलगी साधारणपणे महिन्याची होईपर्यंत रात्रीची अतिशय रडत असे. काही केल्या ती रडायची थांबत नसे. शेवटी मी श्रीबाबांनाच साकडे घातले, की तिचे रडणे थांबू देत, मी साईलीलेत अनुभव प्रसिद्धीसाठी पाठवेन. आणि तेव्हापासून ती रात्रीची रडायची बंद झाली.

आतापर्यंत अनेक अडचणींमध्ये श्रीसाईबाबांच्या आशिर्वादानेच आम्हाल तारले आहे. यापुढेही त्यांचे कृपाछत्र असेच लाभो एवढीच श्रीसाईचरणी प्रार्थना ! ●

# राधाकृष्ण स्वामींना प्रणाम

काय होते पुण्य माझे     पूर्वे जन्मी फळा आले ।
राधाकृष्ण स्वामी माझे     साईकृपे घरी आले ॥

रात्रंदिन सेवा करण्या     * राधा-गोपाल सवे त्यांच्या ।
सहस्र मंत्र घेवुनिया     श्रीसाईनाथ बैसविले ॥

काय सांगू तो आनंद     स्वर माझे दाटले ।
दोन वर्षे नाही झाली     स्वामी स्वर्गवासी झाले ॥

नाही आवरत शोक आता     स्वामी कधी न दिसणार आता ।
कोटी कोटी प्रणाम करते     राधा साई कृष्ण नाथा ॥

( * श्री राधाकृष्ण स्वामीजी मुंबईला आले की ते श्री गोपाळराव इनामदार, प्रभादेवी, मुंबई यांचेकडे उतरत असत. स्वामींनी सौ. चेंदवणकर यांचे घरी येऊन आपल्या हस्ते श्रीसाईबाबांची मूर्ती प्रतिष्ठापीत केली आहे. या प्रसंगीची आठवण होऊन स्वामींच्या द्वितीय श्राद्ध दिनी १४-१-८२ त्यांना वाहिलेली श्रद्धांजली. )

—सौ. तारा चेंदवणकर
१२०/४०५५ राधा-माधव,
टिळक नगर, चेंबुर, मुं. ८९

★

प. पू. राधाकृष्ण स्वामी यांचा पूर्णाकृती पुतळा बंगलोर येथील श्रीसाई स्पिरीच्युअल सेंटर येथे ६-१२-८१ रोजी प्रतिष्ठापित केला गेला या निमित्य श्री. चेतन यांनी श्रीस्वामीजींना वाहिलेली श्रद्धांजली.

# तू आहेस अनंत

मरण तुझे रे झाले आहे असे कसे मी सांगू?।
तू आहेस हाच आनंद माझा अनंत पाहू ॥

तू तर आहेस अनंत माझा आनंदहि अनंत।
रडण्याचे मग कारण नुरते, या जगता दाखवू ॥

जग हे सुखदुःखाचे संग्राम, चाले इथे अविराम।
मी चुकलो लोकांना हसलो, का स्वार्थ रे पाहू?॥

त्यागाचे खंजिर घेऊनि मी आहे अजून जीवंत।
मरण येता जवळी माझा, नित्य चैतन्यांत न्हाऊं॥

—राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
भगतसिंग पथ पाटकर वाडा
डोंबिवली पूर्व ४२१२०१

☆

# साईस्तुती

कृपावन्त हो आता साईनाथ सद्‌गुरू।
आलो शरण मी मज नको अव्हेरू॥
तूच माता, पिता तूच, तूच माझा आधारू।
धाव येई दीनबंधू कृपासिंधू सत्वरू॥१॥

कारुण्यमूर्ती साईनाथ प्रसंन्नवदना।
तव दर्शनमात्रे हरतात सर्व वेदना॥
राव-रंक, लहान-थोर वंदिती तवचरणा।
मार्ग दावी साईनाथा पार करण्या जीवना॥२॥

हे दयाघना द्यावे आता हेच दान।
लाभो सर्व प्राणीमात्रा सुखशांती निधान॥
तुझ्या वरदहस्ते प्रसवले हे स्तुतीगान।
वंदनी तुम्हा, तवचरणी करितो अर्पण॥३॥

—श्री. विजय पु. बनसोडे
५।३५८ म. हा. बोर्ड अभ्युदयनगर,
काळाचौकी, मुंबई नं. ३३

# साई ठेवी मला तुमच्या द्वारा

बाबा साई, बाबा साई, मना आवर बाई
दुःख किती सांगू तुला, भार किती टाकू तुला
तूच माझी हरिसी चिंता, मोकळे करून मला सोडिता
वाटेल तेव्हा हलके हलके, भार टाकीता डोईवरचा।
जीव कशात रमेना, दिवस जाता जाईना।

पाखरु असता उडून जाता, आत्मा शरिरात दडून बसता
कोंडमारा होई जीवाचा, काय काय करू मी जीव जाईना।
आला आला कंटाळा, आयुष्याचे दिवस मोजीता
पळ घटीका भरीना, आत्मा शरीर सोडीना

सोडा साई सोडा साई, मला तुकारामासारखे घेऊन जाई।
सत्याची ही नाही दुनिया संचार करी कलीयुगा।
पुरे पुरे हा जन्म मरणाचा फेरा
ठेवी मला आता तुमच्या द्वारा।

—सौ. कल्पना मं. कोरडे
१८ काकड वाडी, चौथा मजल
आर्य समाज समोर व्ही. पी. रोड,
गिरगाव मुंबई ४

# ❀ मी साईनाथ पाहिले ❀

आज मी साईनाथ पाहिले
कृतार्थ अवघे जीवन झाले ! ॥ धृ. ॥

त्या मूर्तीवर डोळे लावुनी
जांधें मी बसलो पुढती होऊनी
रूप ते हलतांना देखिलें !.. ॥ १ ॥

नेत्री होती करूणा भरली
मूर्ती हलतां मजला दिसली !
हास्य ते मुखावरी विलसले !... ॥ २ ॥

मज गमला तो हात उचलला
कृपा हस्त तो मजला दिसला !
अपुला बाबांनी मज म्हटले !... ॥ ३ ॥

विलग ओठ ते क्षणात झाले
"श्रद्धा सबुरी" शब्द उमटले !
शरीर मम रोमांचित जाहले !... ॥ ४ ॥

कुठली ही पुण्याई साई
आज अशी मम कामा येई !
कुठले पुण्य फळा हे आले !... ॥ ५ ॥

—श्री. तु. नाईक
११ हेलिमा मंझील १ला माळा
गुप्ते रस्ता, डोंबिवली (प.) विष्णूनगर
जि. ठाणे

# साई चरणांचा दास

साईबाबांची आहे अगाध करणी ।
चमत्काराचा पाऊस पडला धरणी ॥
कृपा असु द्या करितो विनवणी ।
नमितो माथा श्री साईचरणी ॥ १ ॥

बाबा, दीन दुबळ्यांचे वाली ।
प्रार्थना करिता धावे आपत्काली ॥
दर्शन देई जपता ध्यानी मनी ।
नमितो माथा श्री साईचरणी ॥ २ ॥

साईबाबास असे सर्व समान ।
सर्वास देति हवे ते वरदान ॥
सर्वस्व पाहुनि धन्य मी मनी ।
नमितो माथा श्री साईचरणी ॥ ३ ॥

साईबाबांची रहाणी साधी ।
तयाचे स्मरण करितो सर्वाआधी ॥
श्रीसाई आराधितो मनोमनी ।
नमितो माथा श्री साईचरणी ॥ ४ ॥

—श्री. जयसिंग वागरे
६६/२ पटेलवाडी, परळ व्हिलेज मुं. १२

☆

# साईबाबांची आरती

जयदेव जयदेव जय साईबाबा
आरती ओवाळीतो तुज गुरुबाबा
जयदेव जयदेव ॥ धृ० ॥

भक्तांसाठी तु प्रगट झालाशी
चूकलेल्याला तु मार्ग दाविशी
आठवण काढता तुझी धावत तु येशी
त्रिवार वंदन माझे तुझ्या पायाशी
जयदेव जयदेव ॥ १ ॥

शिरडी संस्थानी प्रगट होऊनी
मानव देही तू अवतार घेऊनी
जन कल्याणा तु आलासी धावूनी
अगाध करणी तु गेला दावूनी
जयदेव जयदेव ॥ २ ॥

मानव होऊनी झिजला कष्टानी
भक्त जमविले प्रचिती देऊनी
गरिब-श्रीमंत सारे जवळ घेऊनी
भेदभाव सारे जाती विसरूनी

—सौ. मंदा खापरे
मधुशिल्प को. हौ. सोसायटी ब्लॉ. नं. ८-२
मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)

# साई रे

साई रे श्रीसाई रे
अंगणी तुझ्या प्रेम विखुरले
वेचण्या मी ते धावले
वर्षावाने आनंदले !
सुवास तव आसमंतीचा
मनात रे दरवळे
धीराच्या रे देवदूता
मनःशांतीला मी अनुभवले
पावन मज ज्यांनी केले
आज ते साईचरण पुजिले
उदीच्या रे सुवर्णकणांनी
जीवन मज सुसह्य केले !

× × ×

# समर्थ छत्र

बाबा, तुमच्या समर्थ छत्राखाली
मागते मी नित्य सावली
पिलाच्या रे सुखासाठी तहानेली
एक भुकेली मी माऊली
व्याकुळता माझ्या जिवीची
अंतर्यामी तुम्हीच जाणायची
चिंता कशास्तव मी करावी
जाणताना ही तुमची थोरवी
संसाराची माझ्या असामान्य शोभा
साई रक्षावा, अतूट हा गाभा !
मनोमनी ओवाळते आपली आरती
सांभाळावी ही वात्सल्याची भरती

—सौ. वासंती वसंत नांदेडकर
४३, पार्क व्ह्यू बोरीवली ( पूर्व ) मुं. ६६

# साई जग के विधाता

मेरे साईबाबा जग के विधाता
हमें भुल न जाना हमें भुल न जाना–मेरे ॥ धृ ॥
कहाँ तेरी मंझील गलत मेरी राहें
मिलेगी ये तुमसे कैसे निगाहे
हमें अपनी मंझील का रास्ता दिखाना
हमें भुल न जाना हमें भुल न जाना–मेरे ॥ १ ॥
रो रो के कहेता हूँ तुटा हुआ दिल
नहीं हुं मैं तेरे चरणों के काबिल
फिर भी "चंदु" को अपना बनाना
फिर भी हमें तूं अपना बनाना
हमें भुल न जाना हमें भुल न जाना–मेरे ॥ २ ॥

—सौ. चन्द्राबेन भाटे
जयंतव्हिला, रफी अहमद किडवाई मार्ग
वडाळा, मुंबई ४०००३१

# साई महीमा

(चाल :– आला थंडीचा महीमा, झटपट शेकोटी) फिल्म–ह्योच नवरा पाहिजे

साईबाबांचा महीमा – खरोखर भक्तीचा गोडवा।
तया सदैव आठवा – भक्तीने भगवंत मिळवा॥ धृ.॥
तेलाविणा पाण्याने – चिरांगण लावीले।
खळनिंदकांनाही – गर्वमुक्तची केले॥
बंधूभावाची शिकवण – दिली सर्व बांधवा॥ १॥
वेळोवेळी भाविका – हाकेसी धावूनी येई।
किती अनुभव सांगू – वर्णन कधी ना होई॥
वाचा साई चरित्र – तेंव्हा तो कळेल मानवा॥ २॥
भासे पंढरीचा तो – पांडुरंग यथार्थ।
आला मानवरूपे – होवूनी साई समर्थ॥
"दासपंढरी" सांगे – कृपेने उन्नती वाढवा॥ ३॥

—श्री. पंढरीदास महाराज खडेंकर
मु पो. लोही, ता. दारव्हा जि. यवतमाळ

# योग्यता नसता दर्शन कृपा

—सौ. सरोजिनी भालचंद्र निबंधे
उगारखुर्द

● १९५५ मध्ये मला मुलगी झाली. आम्हास आनंद झाला अगोदरच्या बाळंतपणात माझा मुलगा जन्मताच गेला होता. त्यामुळे व त्यावेळी शारीरिक संकट नष्ट झाल्याने मुलगी होऊनही समाधानी होते तत्पूर्वी मी बाबांना नवस बोलले होते. माझे बाळंतपण सुखरूप होऊ दे मी दर्शनाला येईन. म्हणून मी शिरडीस जाण्याचा प्रस्ताव पतिपुढे मांडला त्यांची बाबांच्यावर अगदी श्रद्धा नव्हती ते म्हणाले, 'फकीरांची कसली सेवा करतेस देवाची करावी' एवढे म्हणून कसेबसे माझ्याबरोबर शिरडीस येण्यास तयार झाले. मुलगी एक वर्षाची होती त्यावेळी.

कोरेगावला गाडी आली मुलगी खूप रडू लागली. म्हणून मी त्यांना दूध आणण्यास सांगितले. गाडी २-३ मि. थांबणार होती म्हणून गडबडीने हे स्टॉलवर गेले. त्यांनी काचेच्या ग्लासात दूध मागितले परंतु स्टॉलवाला काचेचा पेला देण्यास तयार होईना. लगेच आणून देतो डिपॉझिट घे हवंतर म्हटले तरीही तो तयार होईना. त्या स्टॉलवाल्याच्या पुढे एक फकीर उभा होता. तो म्हणाला 'बाळ! हा गडू घे दूध ने व परत मला आणून दे' त्यांनी गडू घेतला दूध आणले. फिरकीच्या तांब्यात ओतून गडू परत नेला तर फकीर जाग्यावर नाही. ह्यांना पंचाईत पडली स्टॉलवाल्याने तो फकीर पाहिला होता त्याच्या समोरच तो उभा होता त्याचेकडे फकीराची चौकशी केली तो म्हणाला 'मी फकीर पाहिला नाही तो गडू आमच्या जवळ लागला मात्र ह्यांच्या मनाला हुरहुर लागली. तो फकीर काय म्हणेल. तेवढ्यात गाडीही सुटली प्रत्येक स्टेशनवर पुण्यापर्यंत ह्या फकीरास हुडकला परंतु तो मिळाला नाही.

शिरडीस आलो जागा मिळाली नाही रस्त्यावरच झोपलो सकाळी दर्शन घेतले. बारा वा. पर्यंत देवांचे यथासांग मी केले. एकच्या बसने परत जावयाचे म्हणून हे म्हणाले पाणी भरून घेऊन ये. मी गडू व फिरकी तांब्या घेऊन न्हाणीत गेले. न्हाणीकडे कुणाचाच वावर नव्हता लगेच पाणी घेऊन परत आले ह्यांचे लक्ष माझ्या हाताकडे होते ते म्हणाले 'अग गडू कोठे आहे' मी पुन्हा परत गेले तर गडू नव्हता. आम्ही दोघांनी शोध घेतला शेवटी, बालद्या व भांडी भाड्याने देणाऱ्या ऑफीसात चौकशी केली ते म्हणाले 'आमचेकडे गडू (तांब्या) आला नाही' आम्ही घाबरलो

त्याचे तांबे बघण्यास मागीतले तर काय आश्चर्य त्या फकीराने दिलेल्या ॲल्युमिनियमच्या तांब्यासारखे सर्व तांबे—मग प्रकाश पडला की बाबांनी दिला तांब्या तो त्यांचा त्यांनी नेला तेव्हापासून ह्यांचीही श्रद्धा बाबांच्यावर बसली.

दुसराही प्रसंग असाच घडला. माझी इच्छा घरात बाबांचा मोठा फोटो असावा पूजेत तसा छोटा फोटो होताच. ह्याना ही कल्पना आवडली त्यांना मोठा फोटो दसऱ्याला आणला व दारावर लावला.

दसऱ्याच्या दिवशीच तो फोटो दारावर लावला व सकाळी पूजा करून नैवेद्य करून दाखविला.

पुढच्या गुरुवारी मी जरा मासिक अडचणीत होते. त्या दिवशी दुपारी १२ वा. एक फकीर दारासमोर उभा राहून बाबांच्या फोटोकडे पाहून स्मित करीत असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. त्याला काहीतरी वाढावे असे मनात होते. परंतु अडचणी-मुळे मला शक्य होईना—फकीर म्हणाला ‘बाई भाकरी वाढ ना!’ तोंडातून शब्द गेलेत ‘बाबा! भाकरी नाही’ पुढे जा ‘फोटोकडे पाहून ते म्हणाले भाकरी नाही’ माझ्या डोक्यात लख्खन प्रकाश पडला मी पैसे द्यावेत म्हणून उठले दारात गेले तो फकीर अदृष्य. मला फार वाईट वाटले बाबा प्रत्यक्ष दारात येऊनही मला त्यांना काहीच देता आले नाही.

तेव्हापासून मी फकीर असो कुणीही असो घरात असेल ते वाढते.
बाबांबद्दल मनात अभिमान वाटला बाबांनी दर्शन दिले.

★

## साई प्रसाद प्रधान यांचे निधन

कळविण्यास दुःख होते की, श्रीसाईबाबांचे भक्त व श्रीसाईबाबांच्या सानिध्यात राहिलेले सांताक्रुझचे कै. **रावबहादूर मोरेश्वर** विश्वनाथ प्रधान यांचे चिरंजीव श्रीसाई प्रसाद मो. प्रधान हे शुक्रवार दि. ५ जून १९८१ रोजी शीव मुंबई येथे श्रीसाई चरणी विलीन झाले. ते कित्येक वर्षे शिरडी संस्थान कमिटीचे मेंबर होते. त्यांच्या आत्म्यास श्रीसाई सद्गती देवो.

# एक त्रिकोण

▼▼▼ ▼▼▼ ▼▼▼ ▼▼▼ ▼▼▼

—श्री. दिगंबर शंकर गंधे
११२८, सदाशिव पेठ पुणे ३०

● श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज, शिर्डीचे श्रीसाईबाबा व श्रीदासगुण महाराज असा हा त्रिकोण आहे. हे तिघे बिंदु समजल्यास झालेली घटना ही तिन्ही बिंदुना जोडणारा सांधाच आहे असे समजण्यास हरकत नाही. बाह्यत: श्री टेंबे स्वामी महाराज व श्रीसाईबाबा यांचे दक्षिण व उत्तर ध्रुवा इतके अंतर होते. एकाचा सोवळे ओवळे याबद्दल कट्टर कटाक्ष, तर दुसऱ्याला त्याचा मुळीच धरबंद नव्हता. या दोघांची समक्ष भेट झाली होती किंवा नाही या बद्दल शंकाच आहे. तथापि दोघेजण एकमेकांना अंतर्यामी पूर्ण ओळखत असावेत. संत धर्म व जातीच्या अतीत असतात. श्रीदासगणू महाराज मात्र दोघांच्याही प्रेमाचे स्थान होते असे दिसते. दासगणूंचे सोवळे ओवळे इतके तीव्र नव्हते. तरीही श्री टेंबे स्वामींनी त्यांच्या सोवळ्या ओवळ्या-बद्दल फारसी चिकित्सा केलेली दिसत नाही. कारण कपडे घालून त्यांच्या जवळ गेलेल्या दासगणूंना मज्जाव होत नसे. कोणी स्वामींना तसे विचारले तर कोणीही शिवले तरी चालणाऱ्या विठोबाचा हा भक्त आहे असे सांगून विचारणाऱ्याची ते बोळवण करीत. श्रीसाईबाबा तर दासगणूंना गुरुस्थानीच होते.

एकदा श्री टेंबे स्वामींचा मुक्काम राजमहेंद्रीला होता. जगन्नाथपुरीची यात्रा करून दासगणूंचाही मुक्काम तेथेच पडला. दासगणूंनी स्वामींची गाठ घेतली. स्वामींनी त्यांच्या पुढच्या प्रवासाची माहिती घेतली. प्रवासांती शिर्डीस जाणार, असे दासगणूंनी सांगितल्यावर स्वामींनी श्रीसाईबाबांना देण्याकरिता एक नारळ त्यांच्या स्वाधीन करून आपला नमस्कार त्यांना कळविण्यास दासगणूंना सांगितले. प्रवासात त्यांच्या सहप्रवाशांनी त्यांच्या पडशीत असलेला तो नारळ काढला व फोडून खाल्ला. त्यातील खोबरेही त्यांनी दासगणूंना दिले व ते त्यांनी खाल्ले. शिरडीस बाबांची गाठ झाल्यावरही श्री टेम्बे स्वामींनी भेट म्हणून पाठविलेल्या नारळाची आठवण त्यांना झाली नाही. बाबांनी 'चोर तो चोर व वर शिरजोर' असे म्हटल्यावरही बाबा असे का म्हणतात याचा बोध होईना. मग बाबांनीच आपल्या भावाने दिलेल्या नारळाची आठवण त्यांना करून दिली. अर्थात् तो नारळ नव्हताच. परंतु या प्रसंगाने दोन सत्पुरुषांच्या अंत-रंगाची ओळख दासगणूंना झाली किंबहुना हे अंतरिक तत्त्व बिंबविण्यासाठीच तर ही घटना झाली नसेल ना! नाहीतर एक दुसऱ्याला नमस्कार सांगून भेट पाठवितो व दुसरा त्याला भाऊ म्हणतो याची संगती कशी लावणार? अशा रितीने या तिघांचा या घटनेने एक प्रकारचा त्रिकोण साधला गेला असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही असे वाटते.

# श्रीसाईपरिवार वृत्तविशेष

● श्रीसद्गुरू साईनाथ सेवा मंडळ, लालबाग, भक्तांचे ३१ वे स्नेहसंमेलन सोम. ता. ७-१२-८१ ते रविवार ता. १३-१२-८१ पर्यंत साजरे झाले. ह. भ. प. आत्माराम बुवा बांदेकर, वासुदेव बुवा भोवर, दत्तामिराशी बुवा, दिलीप बुधकर, सुमंत शिंदे यांचे भजनाचे, गायनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

× × ×

● श्रीसाईबाबांची शिरडी द्वारकामाईतील जंगी तसबिर चितारणारे चित्रकार कै. शामराव जयकर यांचे नातू चि. किशोर (कै. श्रीपाद जयकर यांचे पुत्र) यांचा विवाह चि. माधवी (श्री. रवींद्र नायक यांची कन्या) हिजबरोबर गुरुवार दिनांक १७-१२-८१ रोजी अंधेरी येथे झाला. वधूवरांचे शुभचिंतन !

× × ×

● साईभक्त लक्ष्मीकांत माल्वणकर यांचे पुत्र श्री. दिलीप यांचा विवाह श्री. राघवेंद्र कवाड यांची कन्या कु. तारा हिजबरोबर १८-१२-८१ रोजी दादर भगिनी समाज, हिंदु कॉलनी दादर येथे साजरा झाला. वधूवरांचे शुभचिंतन !

× × ×

● श्रीसद्गुरु साईनाथ कृपामठ पुणे येथील श्रीसाईबाबांच्या मूर्तीला यंदा मार्गशीर्ष पौर्णिमेला (दत्तजयंती) २५ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्य रौप्य महोत्सव तीन दिवस मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला.

× × ×

● मुंबईचे साईभक्त व कवी श्री. दा. र. दळवी यांची कन्या गीता हिचा शुभविवाह चि. रविंद्र (कै. डॉ. दत्तात्रय राणे यांचे पुत्र) यांचेबरोबर बुध. दिनांक ४-११-८१ रोजी सूर्यवंशी क्षत्रिय सभागृह येथे थाटाने पार पडला. वधूवरांचे अभिष्ट चिंतन !

# माझ्या राजुचा लग्न सोहळा

२८

**लीलाताई शं गोलतकर**
अभंग बिल्डिंग,
परेल व्हिलेज मुं. १२.

राम कृष्ण साई यामध्ये भेदची नाही. साई चरित्र ओवी ह्याप्रमाणे मी साईबाबांना कृष्णरुपात पहात असते. माझ्याकडे श्रीकृष्णाचा चैतन्यमय असा सुंदर मोठा फोटो आहे. त्याला मी राजू भैय्या म्हणत असते. तोच राजू नी तोच साई कृष्ण ह्याच्याकडे पाहिलंना की तहान भूक अगदी हरपून जाते.

दिवाळी झाली की तुळशीची लग्न म्हणतात. पण माझ्याकडे मात्र राजूचं लग्न म्हणतात त्याचे लग्न मी दरवर्षीच मोत्याच्या मुंडावळया बांधून नवरदेव सजवून तुळशी बरोबर लावून देत असते. त्याचे लग्न एवढे धुमधडाक्याने पार पडते की, माणसाच्या लग्नाचे काय घेऊन बसलात.–साक्षात् परमेश्वरच तो द्वारकाधीश भगवान गोपालकृष्ण. त्याचा थाट अवर्णनीय असणारच–

पण राजू तुला मुलीकडची माणसं काय काय देणार रे. मी सांगते त्याप्रमाणे त्यांच्याकडून आले पाहिजे आपल्याला. नाहीतर तुला फसवतील. म्हणून काकांना मी नेहमी चिडवीत असते. काका म्हणतात, आमची मुलगी जगकर्ती आहे. तशी तुम्हाला मिळणार आहे काय ! आणि आम्ही तुम्हाला दिले तर तुम्ही ठेवणार कुठे. तुम्हाला जागा आहे काय—ते काय आमचे आम्ही पाहून घेऊ. आम्हाला ब्लॉक द्या घेऊन. मग ते म्हणणार तुम्हाला काय काय पाहिजेना ते लिहून द्या ! आम्ही लिहून देणार नाही. तुम्ही आम्हाला कोर्टात खेचाल. असा विनोद लग्नसोहळा होईपर्यंत चाललेला असतो. मुलीकडची पण माणसे खूप असतात. तशीच मुलाकडची पण खूप असतात. त्याच्या राखी बांधणाऱ्या बहिणी वगैरे—

आता आपण लग्न घरी जाऊ–नोव्हेंबरची ८ ता. १९८१ रविवार कार्तिकी एकादशी होती. त्या दिवशी माझ्या राजूला रात्री ९ वाजता हळद लावायची होती. बिल्डींग मधल्या सुवासिनीना सांगितले होते. माझ्या राजू भैय्याला हळद लावायला या हं ! सकाळी विघ्नहर्त्या गणेशाला विडा ठेवून लग्नसोहळा चांगल्या रितीने पार पडावा म्हणून गाऱ्हाणे घातलेले होते नि त्याचवेळी माझ्या साईकृष्णाला राजूला शिर्डीहून लवकर निघून ये. तुला आज रात्री ९ वाजता हळद लावायची आहे नि उद्या रात्री ८ वाजता तुझे लग्न लावायचे आहे. तेव्हा ताबडतोब निघून ये असे सांगितले नि मी माझ्या कामाला लागले.

आणि संध्याकाळी ६-३० वाजता नवरदेव माझा साईकृष्ण राजू एका साई-भक्ताबरोबर आला. लग्नाचा आनंद कुणाला होणार नाही. ( साईबाबांचा पाठीमागे वचन लिहिलेला फोटो आणून दिला. ) मला गहिवरून आले. मी त्याचा पापा घेतला. मी त्यांना सर्व सांगितले. माझ्या राजूला आता ९ वाजता हळद लावायची आहे. उद्या रात्री ८ वा. लग्न आहे त्याचे. मी वाट पहात होते त्याची. त्यांना पण साईलीलेचे कौतुक वाटले. खरेच बाबांची लीला किती अगाध आहे नाही. त्यांनी येतेवेळी बाबांसाठी मला मोठा हार, नारळ, म्हैसुरी अगरबत्ती, बिस्किटाचा पुडा आणला होता. त्यांचे नाव दामोदर माने. अंबरनाथला रहातात ते.

आणि रात्री ९ वाजता श्रीकृष्णाला म्हणजेच साईकृष्णाला राजूला. सुवासिनींनी गीत म्हणून अंगाला हळद लावली. घरी असलेल्या व आलेल्या साईबाबांना पण लावली. माझ्या डोळ्याचे पारणे फिटले. थोड्या वेळाने मी आंघोळी घातली. कारण हळदीचे अंग कसे ठेवायचे. दुसऱ्या दिवशी सोमवारी बडेसांबार जेवण घातले नि रात्री ठीक ८ वाजता ताशावाजंत्रीच्या आवाजात लाऊड स्पीकरच्या गाण्यात आमच्या राजू भैय्याचा लग्नसोहळा आनंदाने रुखवातीसहीत मानापानाने पार पडला. त्याचे वर्णन मी काय करणार. परमेश्वरीचा सोहळा तो. इंद्राची सभा येणारच. देवदेवता हजर रहाणारच. पण मी मात्र माझ्या भावाच्या कर्तव्यातून मोकळी झालेल्याचा आनंद मला झाला.

बाबांची साईचरित्र ओवी—

प्रेमाचा मी सदा भुकेला। हाक हाकेला देतसे। आणि म्हणूनच मी त्यांना प्रत्येकवेळी हाक मारीत असते. अशा त्या भगवान साईकृष्णाला माझ्या साईभक्तासहीत अनंत कोटी कोटी प्रणाम!

नित्य मी जीवंत जाणा हेचि सत्य
नित्य घ्या प्रचित अनुभवे

हे बाबांचे वचन कधीही खोटे ठरणार नाही.

★

# ● श्रीसाईगीत तुषार ●

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

**श्री. सुहास महादेव देसाई ऑटॉपहिल, मुंबई यांनी लिहिलेल्या श्रीसाई गीत तुषारचा हा शेवटचा हप्ता आहे. गेली तीन वर्षे त्यांनी श्रीसाई गीत तुषार श्रीसाईलीलेतून प्रकाशित केल्याबद्दल त्यांचे आभार. त्यांचे हे तुषार पुस्तक रुपाने लौकर प्रसिद्ध होवोत व गीतरुपाने व्यास-पीठावर येवोत अशी श्रीबाबांच्या चरणी प्रार्थना.**

**—का. संपादक**

---

ईश्वर प्रत्येक युगात जन्म घेतो. आपल्या लाडक्या भक्तांसाठी. ज्ञानेश्वरांचा विठ्ठल, संत मीरेचा कृष्ण, तर कधी कबीरांचा राम वेगवेगळ्या स्वरुपात वावरणारा ईश्वर हा एकच श्रीसाईंचे अनेक भक्त होते. परंतु तात्यांवर साईंचा अत्यंत विश्वास होता. अशा ह्या तात्यांवर विजयादशमीला मरण येणार असे साईंनी अगोदरच भाष्य केले होते. परंतु माझ्या तात्यांना वाचवा असा आक्रोश करणाऱ्या तात्यांच्या पत्नीला दिलेले वचन साईंनी पाळले आणि ठरलेल्या त्याच दिवशी श्रीसाई भक्तासाठी मृत्युच्या सामोरे गेले, आणि तात्या पूर्ण बरे झाले.

## साई म्हणूनी शिरडी आले ( २३ )

साई म्हणूनी शिरडी आले तात्या साठी आज चालले ॥ धृ ॥

युगे अठ्ठावीस उभे राहिले
भगवंताचे रुप सावळे
मुर्तिमंत ते तेज दरवळे
दिंडी अरण्य अमर जाहले

विठ्ठल म्हणूनी पंढरी बसले चंद्रभागेने चरण स्पर्शिले ॥ १ ॥

संत मीरेने विष प्याले
विषाचे हो अमृत झाले
तुळशीदास हो अंध जहाला
प्रभू रामाने दर्शन दिधले

भक्तासाठी वाली वधिले सुख शांतीचे राज्य निर्मिले ॥ २ ॥

नाही आता जिणे उरले
साई नाम मुखे घेतले
उग्र व्याधिने तात्या धरले
आयुष्याचे दिस संपले
विजयादशमी मरण कळले साई मुखे भविष्य आले ॥ ३ ॥

तात्या मनी साई स्मरले
भक्तासाठी देव धावले
व्याधिमुक्त तात्या झाले
साई मुखातून रक्त वाहले
विजयादशमी मरण घेतले भक्तासाठी साई चालले ॥ ४ ॥

भक्त दूरचे शिर्डी धावले
साई जीवनी काय घडले
भक्तांसाठी कष्ट सोसले
घाव सोसूनी देव जाहले
दिपस्तंभाने प्रहर सोसले जगतासाठी साई जन्मले ॥ ५ ॥

× × ×

## आज मोहरम आज दसरा (२४)

विजयादशमीच्या अगोदर एक घटना घडली. साईच्या आगमना बरोबर आलेल्या त्यांच्या जीवाच्या पेक्षा प्रिय असलेल्या विटेचे एका बालकाच्या हातून तुकडे झाले ह्या घटनेचे त्यांना अतोनात दुःख झाले. आणि त्यांच्या मुखातून शब्द प्रहर झाला. मी आता खरोखर जाणार.

महानिर्वाणाचा दिवस उगवला. बाबांनी लक्ष्मीबाईच्या हातावर नऊ रुपये ठेवले. सारे भक्त शोकाकूल झाले होते. भर दुपारच्या प्रहराला "अल्ला मालीक ह्या मंगल नामाचा घोष करीत साई ज्योत पंचमहाभूतांत विलीन झाली. त्यांच्या निधनानंतर त्यांचे शरीर तीन दिवसानी बुटींच्या वाड्यात समाधीस्थ केले, आणि राधा-कृष्णाच्या मूर्ती ऐवजी त्या ठिकाणी साईनी चिरशांती घेतली.

आज मोहरम, आज दसरा साई जाती घरा आपुल्या
भाव भक्तीच्या संगमातला, दत्त दिगंबर आज चालला ॥ धृ ॥
विजयादशमी दिवस उगवला
भक्त आले दर्शन घ्याया

भर माध्यानी प्रहर जाहला
शांत मूर्ती बसे तपाला
स्वर्ग भेटे प्रिय घरेला, देव ऋषिंनी गंध उधळला ॥ १ ॥

मऊ विटेला स्पर्श जाहला
उशी बनविली निज शेजेला
प्राण तयाला साई मानला
बालक हस्ते जीव भंगला
प्रकार सारा मनी जाणला, कार्यभाग तो आज संपला ॥ २ ॥

जेवण देई रोज प्रभुला
भाव भक्तीचा साई भुकेला
नऊ रुपयाची नाणी दिधली
माय लक्ष्मी कृतार्थ झाली
नऊ ग्रह ते दिधले तिजला, प्रसन्न केले साई प्रभुला ॥ ३ ॥

दुपारच्या त्या द्विपहराला
कंठा मध्ये शब्द संपला
नश्वर देही प्राण चालला
श्वासा मागूनी श्वास चालला
दिव्यत्त्वाच्या साई ज्योतिला, ब्रह्मानंदी मार्ग लाभला ॥ ४ ॥

हिंदू यवनी भेद जहाला
साईकृपेने मार्ग मिळाला
श्रीकृष्णाच्या मंदिरातला
साई प्रभु देव जहाला
भाकीत केले साई बुटीला, येईन तेथे मी रहायला ॥ ५ ॥

× × ×

## चला साईंच्या शिरडी जाऊ (२५)

अशा ह्या कनवाळू साईंनी आपल्या अमोल वाणीतून अकरा वचने दिली आहेत. त्यांचे सतत स्मरण केल्याने जीवन दुःखमुक्त होईल आणि त्या जीवनाला साई भक्तीची गोडी दिलीत, तर हा दुःखमय अथांग सागर सहज तरुन जाल. जीवन हे जगण्यासाठी आहे. संपवण्यासाठी नव्हे. ईश्वराला अनन्यभावे शरण जा, शिर्डीची वारी

करा. मी समाधीतूनही तुमचे रक्षण करीन. " साई समर्थ " या मंगलनामाचा जयघोष करणाऱ्या साईभक्तांना खरोखरच साईबाबा आजही दुःखमुक्त करीत आहेत. अगदी दिलेल्या वचनाप्रमाणे—

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥
चला साईंच्या शिर्डी जाऊन दर्शन घेऊन होवूं पावन ॥ धृ ॥

मानव जीवनी मार्गावरुनी
सुखदुःखाच्या सरी येवूनी
कधी यशाचे माप घेवूनी
दिव्यत्वाने जाऊ दिपूनी
संकटातूनी, अपयशातूनी, साई करूं दे तुमचे रक्षण ॥ १ ॥

निपुत्रिकांना पुत्र लाभूनी
नवसे कन्या पुत्र मिळूनी
संकट समयी साथ देवूनी
भक्तासाठी कष्ट सोसूनी
श्रद्धेतूनहि, भक्तीतूनहि, ध्यानी येवू दे तुमचे लक्षण ॥ २ ॥

अनन्यभावे जाऊनी शरणी
काया वाचा मने पुजूनी
प्रभात समयी वंदन करूनी
पूर्ण भक्ती साई ठेवूनी
दारिद्र्यातूनी, दुःखातूनही सदा राहू दे तुमचे किर्तन ॥ ३ ॥

साईरुपे शरीर सोडूनी
भक्तासाठी येई धावूनी
आज समाधी इथे बांधूनी
मंदिर झाले साई कृपेनी
कष्टातूनही, कर्तव्यातूनी नित्य होवू दे साई चिंतन ॥ ४ ॥

भाग्यवंत हो तुम्ही जीवनी
साईकथेचे श्रवण करुनी

पाप कर्म ते गेले पळूनी
आशिर्वादे मिळो जीवनी
आयुष्यातूनी, नित्यक्रमातूनी, साई होवूं दे पूर्ण मिलन ॥ ५ ॥

– **श्री. सुहास देसाई**
सी. जी. एस. कॉलनी, ब्लॉक नं. १९४०
बिल्डिंग नं. १९०, सेक्टर ६
अँटॉप हिल, मुं. नं. ३७

# शिरडी–वृत्त माहे ऑक्टोबर सन १९८१

या महिन्यात श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्यामुळे बाहेरगावचे साई-भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती.

**दसरा उत्सव १ ला दिवस :** बुधवार, दि. ७-१०-८१ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती सुरू झाली. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साई सच्चरित अध्याय वाचनास सुरवात झाली. समाधी मंदिरात सकाळी ६-३० वा. श्रींचे स्नान झाल्यावर नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. श्री. गंगाधर शास्त्री बीडकर, बीड यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती झाल्यानंतर ७-३० ते ९ वाजेपर्यंत व ९-३० ते ११ पर्यंत श्री. छोटा गंधर्व, रेडीओ स्टार पुणे यांचे गायन झाले. रात्रौ ९-१५ ते ११-१५ पर्यंत श्रींच्या पाल-खीची मिरवणूक वादयांच्या गजरात गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :** गुरुवार दि. ८–१०–८१ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती सुरु झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे समाधी मंदिरात आली. नित्य कार्यक्रम व्यतिरिक्त ९ वा. भिक्षाझोळी कार्यक्रम झाला. मा. रिसीव्हर क. हि. काकरे साहेब यांनी स्वतः झोळी घेऊन उपस्थित साईभक्तांना झोळ्या दिल्या. शिर्डी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षा झोळीत गहू, तांदुळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती

अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १० ते १२ पर्यंत ह. भ. प. श्री. गंगाधर शास्त्री बीडकर, बीड यांचे श्री साईबाबा पुण्यतिथी आख्यान कीर्तन झाले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटण्यात आला.

दुपारी १ ते ३ पर्यंत श्रींचा आराधना विधी कार्यक्रम मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी ब्राह्मणांना धोतर, उपरणे, व सुवासिनींना खण दिले. सेवेकऱ्यांना धोतरजोड व कपडा दिला. सायंकाळी ५ वा. सिमोल्लंघन मिरवणूक वाजतगाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या निशाणाचे व शमीचे पूजन झाल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर मा. रिसीव्हर साहेब व उपस्थित मंडळीनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले, व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

सायंकाळी धूपारती झाल्यावर ७–३० ते ८–३० पर्यंत मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बँडपथक भोईवाडा परेल मुंबई यांचा बँड वादनाचा कार्यक्रम झाला.. रात्री ९–१५ ते १२ पर्यंत श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली होती. मिरवणुकीला श्रीकृष्ण बँडपथक अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ व राहता येथील बँडपथक मिरवणुकीबरोबर होते. साईभक्तांचे भजन, गायन, नृत्य कार्यक्रम झाले. श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर पुणे, तसेच लोकल ग्रामस्थांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. मिरवणूक रात्री १– ला मंदिरात आली व भक्तमंडळीनी कलाकाराचे गायनाचे कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव ३ रा दिवस :** शुक्रवार दि. ९–१०–८१ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरूस्थान ठिकाणी सकाळी ७–३० ते ८–३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमा व्यतिरीक्त रात्रौ ८–३० ते १० पर्यंत श्री. लक्ष्मण बुवा वाघचौरे शिर्डी यांचे एकादशी निमित्त प्रवचन झाले. व त्यानंतर शेजारती झाली.

**दसरा उत्सव ४ था दिवस :** शनिवार दि. १०–१०–८१ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगल स्नान झाले. सकाळी १०–३० ते १२ वाजे पर्यंत श्रीं. गंगाधर शास्त्री बीडकर महाराज यांचे काला कीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली. व तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. धूपारतीनंतर रात्रौ ७–३० ते १० वाजेपर्यंत सौ. रजनीताई जोशी, रेडीओस्टार मुंबई यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा :** डॉ. के. बी. गव्हाणकर आणि पार्टी यांनी रात्रौ ८ ते १० कलाकारांची हजेरी व १० ते १२ वाजेपर्यंत कीर्तन कार्यक्रम केला. रात्रौ १२ वा. श्रीसाईबाबांची पूजा व चंद्र पूजा कार्यक्रम मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांचे हस्ते झाला. उपस्थित भक्त मंडळीना दूध, पोहे वगैरे प्रसाद वाटण्यात आला. रात्रौ १२–३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत डॉ. के. बी. गव्हाणकर आणि पार्टीतील सहकाऱ्यांनी भजन, गायन, नकला, नृत्य, वादन वगैरे करमणूकीचे कार्यक्रम करून रात्रभर जागर केला. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. त्यांची नावे खालील प्रमाणेः–

**कीर्तन** :– १) ह. भ. प. श्री. गंगाधर शास्त्री बीडकर. बीड.
२) ह. भ. प. सौ. सहस्त्रबुद्धे.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. श्री. लक्ष्मण बुवा, वाकचौरे. शिर्डी.
२) ह. भ. प. श्री. प्रभाकर शंकर थिडे, पुणे.
३) ह. भ. प. श्री. मेघःश्याम रानडे, मडगाव गोवा.
४) ,, ,, ,, श्री. गणसु वैकूंठ नाईक, शिरोडेगाव.
५) ,, ,, ,, श्री. विठ्ठल बाबा हैद्राबाद.
६) ,, ,, ,, श्री. मुरलीधर रामराव देशमुख, शिर्डी.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे :–**

१) सर्वश्री नवरात्र महोत्सव मंडळ, शिर्डी. २) रामभक्त मंडळ इंदौर. ३) वैश्य समाज भजनी मंडळ, भिवंडी. ४) साईनाथ भजन महिला मंडळ, शिर्डी. ५) श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई. ६) डॉ. श्री. एम. के. किर्तीकर मुंबई. ७) मा. श्री. छोटा गंधर्व, पुणे. ८) मनोहर चांदोरकर, पुणे. ९) कु. सचेता दौंडरे, पुणे. १०) सुभाषचंद्र कामत पुणे. ११) भाऊसाहेब गोखले, पुणे. १२) दामू अण्णा दळवी, श्रीरामपूर. १३) कुमार रघुवीर शांताराम मिराणे, शिर्डी. १४) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर १५) सौ. नंदिनी सुभाष पाटील, १६) कु. मनिषा विश्वनाथ केळकर, औरंगाबाद १७) सर्वश्री अघोरकर, औरंगाबाद. १८) रावसाहेब देशमुख, अमरावती. १९) भोलानाथ समेळ, मुं. २०) अनंतराव राणे, मुं. २१) सौ. सविता सुरेश गिजरे, शिर्डी २२) श्री. अरविंद राणे, मुं. २३) सौ. अंजम्मा चिरंजीवी हैद्राबाद. २४) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. २५) छबूराव अहिरे, हनुमंतगाव. २६) रघुनाथ शंकर लांडगे, संगमनेर. २७) सी. व्ही. प्रसाद, हैद्राबाद, २८) नारायण क्षीरसागर, २९) राजेंद्र सखाराम साल्कर, ३०) विष्णू मोबे, नेरुल (गोवा) ३१) कु. कल्पना प्रभू मुं. ३२) श्री. किशोर देवनदास देवळेकर, बडोदा. ३३) हरकचंद चंद्रभान वणवाल,

आलेगाव पागा. ३४) सौ. प्रतिभाताई जोशी, नासीक. ३५) सौ. पी. डी. पैठणकर, नासिक. ३६) श्री. विठ्ठल विष्णू मांजरेकर, शिर्डी ३७) शाहू भोसले, मुं. ३८) श्री. जगन्नाथ महादेव गणाचार्य, मुं. ३९) लीलाताई गुजराथी, शिर्डी, ४०) सौ. मिलन अण्णासाहेब वाघमारे, पंढरपूर. ४१) श्रीसाई माऊली भजनी मंडळ, हैद्राबाद. ४२) सर्वश्री स्वामी रामानंद कर्नुल. ४३) ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. ४४) अन्नपुर्णा देवी, शिर्डी ४५) नानासाहेब कोराटे, शिर्डी. ४६) चंद्रकांत मांजरेकर मुं. ४७) रत्नाकर कोराटे, शिर्डी. ४८) नटवर विसपुते, शिर्डी. ४९) राजेंद्र प्रसाद गोयल, दिल्ली. ५०) ए. बी. कारोड, ५१) स. श. गुरव, ५२) शिवाजी तुकाराम धुमाळ, शिरडी. ५३) ज्ञानबा तात्या वाडेकर, शिरडी. ५४) बारकू शेठ मुं. ५५) शशीकांत दळवी, मुं. ५६) विलास परळकर मुं. ५७) विलास महाडीक, मुं. ५८) सुभाष जयवंत कांबळी, मुं. ५९) सत्यवान सावंत, मुं. ६०) रघुनाथ शेठ नागरे, शिरडी. ६१) चतुर्भुज शेठ नागरे. ६२) बारावकर काका, शिरडी. ६३) माणिकराव साळी, शिरडी. ६४) सुरेश अंजर्लेकर मुं. ६५) शांताराम मिराणे, शिरडी. ६६) शिवा माने, मुं. ६७) धनराज नायडू हैद्राबाद. ६८) विवेक या. मुळे, हैद्राबाद. ६९) महेश शंकर अधिकारी मुं. ७०) अशोक सावंत, मुं. ७१) श्रीकृष्ण बॅण्डपथक, परेल मुं. ७२) कार्पोरेशन कॉलनी भजनी मंडळ, नागपूर. ७३) सौ. रजनीताई जोशी, मुं. ७४) अण्णासाहेब थत्ते, मुं. ७५) दत्ता जोगदंडे, मुं. ७६) कु. रश्मी जोशी, मुं. ७७) श्रीसाई सेवा समिती न्यु. दिल्ली. ७८) रमेश धनावडे, मुं. ७९) जनार्दन राणे, मुं. ८०) रमेश जाईल, मुं. ८१) रामदास पाटील, मुं. ८२) आप्पा सामंत, मुं. ८३) शाहीर मधू कड्ड, मुं. ८४) मोहन पाटील, मुं. ८५) सुखदेव कांबळी, मुं. ८६) विनायक लाड, मुं. ८७) सुभाष फोंदे, मुं. ८८) शशीकांत पुसाळकर, मुं. ८९) दत्ता मोरे, मुं. ९०) सुधीर चांदे, मुं. ९१) सौ. अल्का रिसवाडकर मुं. ९२) श्री. नामदेव केणी, मुं. ९३) एकनाथ धनावडे मुं. ९४) रामचंद्र बोभारे, मुं. ९५) श्री. काळे, मुं. ९६) वसंत गव्हाणकर, मुं. ९७) अरुण शहाणे, मुं. ९८) अमर साईनाथ मंडळ हैद्राबाद. ९९) श्रीसाईबाबा आरती सत्संग, थिलाईनगर. १००) पंडीत आप्पासाहेब पागे, कोळपेवाडी १०१) इस्माईल धनुखी, इस्माईल हद्दूखाँ, भोपाल. १०२) श्री. जयवंत कुलकर्णी मुं. १०३) अनंतराव पांचाळ, मुं. १०४) हेमंत ज. पंडीत, मुं. १०५) श्रीमती ज्योती ए. तनुजा, मुं. १०६) श्री. ए. एम. मनुजा, मुं. १०७) श्रीसाईबाबा सेवा मंडळ मालभाट भडगाव गोवा १०८) मधूबाला मनमोहन चावला, मुं. १०९) अरुण गुप्ते, डोंबीवली. ११०) सौ. शुभदा रामराव देशपांडे, भंडारा. १११) चंद्रकांत गणेश लिमये, मुं. ११२) दयाळ दत्तात्रय तुकाराम सातारा. ११३) सौ. चंद्रबाला विठ्ठलदास भाटे, मुं. ११४) श्री. मोहन शिरोडकर, मुं. ११५) श्री. विश्राम मोहन शिरोडकर, मुं. ११६) कु.

वंदना मोहन शिरोडकर. ११७) श्री. वसंत काशीनाथ काडनेकर, मुं. ११८) श्री अनंतराव दत्ताराम पांचाळ, मुं. ११९) सौ. शकुंतला मोरेश्वर जोशी, नाशिक.

**लक्ष्मीपूजन** :– दिवाळीला श्रीसाईबाबांचा लक्ष्मी पूजन कार्यक्रम मा. रिसीव्हरसाहेब श्री. क. हि. काकरे यांचे हस्ते झाला. धुपारती झाल्यावर साईभक्तांना तीर्थ प्रसाद वाटण्यात आला.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

**सत्कार समारंभ** :– साईभक्त श्रीराम विष्णू सातर्डेकर. परेल मुंबई यांनी साईबाबांच्या पुढे १०० गायनाचे कार्यक्रम सादर करून साई सेवा केली. त्यांचा संस्थान तर्फे, मा. कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

# शिर्डी वृत्त–माहे नोव्हेंबर १९८१

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्त मंडळी बरीच आली होती. काही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे–

**कीर्तन** : १) ह. भ. प. श्री श्रीकृष्ण पंढरीनाथ कुलकर्णी, मुं.
२) ,, ,, ,, ,, गंगाधर ना. कोपरकर, पुणे.
३) ,, ,, ,, ,, सुबोध मोरगावकर, पुणे.

**प्रवचन** : १) ,, ,, ,, ,, लक्ष्मणबुवा व कचौरे, शिर्डी.
२) संत हिराबाई देशमुख, आळंदी.
३) ,, ,, ,, ,, मुरलीधर देशमुख, नगर.
४) ,, ,, ,, ,, विश्वनाथ पंडीत सहाणे, सुराळा.
५) ,, ,, ,, ,, जगन्नाथबुवा वाकचौरे, शिर्डी.
६) ,, ,, ,, ,, बाल व्यास, सरस्वती, मुं.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे** : १) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुं. २) श्री. तिलकराज शिवराम पुष्कर्णा ३) जयश्री शिवराम पुष्कर्णा मुं. ४) श्री. पांडुरंग वामन भोसले, मुं. ५) प. पू. भक्तराज महाराज, इंदौर ६) श्री. रामचंद्र लक्ष्मण निर्गुडकर ७) श्री. वामन गणेश जोग, इंदौर ८) श्रीमती मीना संगम, मुं. ९) श्री सत्यसाई

समिती, उल्हासनगर १०) श्री सिद्धी विनायक गायन पार्टी, मुं. ११) श्री. भबूल सीमापूरी १२) श्री. गिरीराज, मुं. १३) श्री. राजेश नागजी, मुं. १४) सौ. शुभाताई ज. धामणकर, पुणे १५) राजाभाऊ दुमणे, पुणे १६) श्री. नागेश वि. लिंगरस, पुणे १७) श्री. बळीराम दांडूक, मुं. १८) श्री. चोखेलाल खेडुले, रायपूर १९) श्री. भगवती साईसमाज, नारायणबाबा, कुर्ला २०) ह. भ. प. कै. पांडुरंग बाळा मडवी, भजनी मंडळी, ठाणा २१) आत्मशांती भजनी मंडळ, मुं. २२) गीता लक्ष्मण पारकर, मुं. २३) ह. भ. प. जैन अनंत सदरे, ठाणा.

**कार्तिकी एकादशी :** सालाबादप्रमाणे कार्तीक एकादशीनिमित्त रात्री कीर्तन झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**तुळशी विवाह :** श्रींचे द्वारकामाईत सालाबादप्रमाणे तुळशीविवाह कार्यक्रम संपन्न झाला. संस्थान कर्मचारी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. मुलानी फटाके, भुईनळे लावून आनंद व्यक्त केला.

**हवा पाणी :** शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. थंडीचे प्रमाण वाढले आहे.

★

## श्रीमती आनंदीबाई मुळे यांचे देहावसान

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या मुख्य कार्यालयातील एक पर्यवेक्षक श्री. चंद्रकांत बापूराव मुळे यांच्या मातोश्री श्रीमती आनंदीबाई यांचे २३-९-८१ रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७० वर्षांचे होते. त्या ईश्वरभक्त व धार्मिक व्रत वैकल्यांचे नियमित पालन करणाऱ्या होत्या. श्रीसाई मृताचे आत्म्यास सद्‌गती देवो.